MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा


वर्ष एकोणिसावे / अंक १२ / डिसेंबर २०१८

## संपादकीय

### कल्पना : विज्ञानाची आणि कवीची

कल्पना जिथे थांबत नाहीत ते क्षेत्र म्हणजे विज्ञान. 'जे न देखे रवी ते देखे कवी' ही उक्ती आपल्याला माहितीच आहे. अनेक अघटित घटना जेंव्हा मांडल्या जातात तेंव्हा त्याला आपण कवी-कल्पना म्हणतो. आपलं प्राचीन वाङ्मय हे अशा अनेक कवी-कल्पनांनी भरलेलं आहे. कवी आणि विज्ञानामध्ये फरक एवढाच आहे की, अनेक कल्पनांना विज्ञान वास्तवात उतरवते. म्हणून असं म्हटलं तर गैर ठरणार नाही की, जो कल्पनेत जगतो तो कवी, आणि जो कल्पना वास्तवात आणतो तो वैज्ञानिक. थोडक्यात, कवी एवढीच विज्ञानालाही कल्पनेची गरज असते. वाफेचं इंजिन असो, आकाशात भरारी घेणारं विमान असो, किंवा समुद्राच्या तळाशी जाऊन थांबणारी पाणबुडी असो, एकेकाळी या सर्व कवी-कल्पनाच होत्या.

सध्या विज्ञानानी अशीच एक कवी-कल्पना वास्तवात उतरवली आहे.



**He Jiankui, जनुकांच्या शृंखलेमध्ये हस्तक्षेप करुन पहिल्या Designer Baby चा निर्माता शास्त्रज्ञ (नोव्हेंबर २०१८).**



**लुई ब्राऊन, वयं - ४० वर्ष. पहिली कृत्रिम गर्भ धारणा अपत्य (Test tube baby, In Vitro Fertilisation)**

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

He Jiankui या फक्त ३४ वर्ष वयाच्या चिनी जैवभौतिकशास्त्रज्ञाने गर्भाच्या जनुकांच्या नकाशामध्ये हस्तक्षेप करून नवीन अर्भकांना जन्म दिला. 'लुलू' आणि 'नाना' या त्या जुळ्या बहिणी. त्यांच्यातील एका पालकाला HIV ची बाधा झाली होती, आणि नैसर्गिकरित्या होणाऱ्या त्यांच्या अपत्यालाही HIV ची बाधा होण्याची शक्यता होती. ती तशी होऊ नये म्हणून या चिनी शास्त्रज्ञांनी जनुकांच्या शृंखलेमध्ये हस्तक्षेप करून नवीन गर्भाला अशा बाधेपासून मुक्त केले. हे करणे त्याला ज्या तंत्रज्ञानामुळे शक्य झाले ते CRISPR तंत्रज्ञानही गेल्या ५-६ वर्षातच विकसित झालेले आहे.

या तंत्रज्ञानाचा वापर हा शेती, आणि प्राण्यांच्या प्रयोगामध्ये साहाजिकच सुरुवातीला केला जाऊ लागला. अशा प्रकारचे सगळेच प्रयोग आधी प्राण्यांवर होतात व नंतर त्यांची चाचणी मानवावर व्हायला लागते. साहाजिकच CRISPR हे तंत्रज्ञान मानवी गर्भावर वापरण्याची तयारी वैज्ञानिकांची असली तरी त्याला वैज्ञानिक नैतिकतेचे नियम व धोरणांमुळे परवानगी नव्हती. तरीही या चिनी संशोधकानी आज अशा प्रकारे जनुकांच्या रचनेमध्ये हस्तक्षेप केला, आणि २६ नोव्हेंबरला यूट्यूबच्या माध्यमातून त्याने ते जाहीरही केले.

चिनी आणि जगातल्या या क्षेत्रातील सर्व वैज्ञानिकांनी याबाबतीत आपली नापसंती जाहीर केली. अजूनही त्याचे हे संशोधन आणि निष्कर्ष जगमान्य संशोधन पत्रिकेतून प्रकाशित झालेले नाहीत. 'जनुकांमध्ये हस्तक्षेप' (Gene editing) या तंत्रज्ञानानी अपत्य जन्माला घालावे की नाही याबाबत वैज्ञानिकांमध्ये अनेक मतभेद आहेत. म्हणून त्याची दुसरी बाजूही समजून घेणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

आपल्या प्रजोत्पादनामध्ये नैसर्गिकरित्या काही बदल होऊन (Mutation) काही दुर्धर व्याधींनी ग्रस्त अपत्य जन्माला येण्याची शक्यता असते. हिमोफेलिया, रक्ताचा कर्करोग अशा व्याधी घेऊन अनेक मुलं जन्माला येतात. यातली बहुतेक मुलं ही फार काळ जगू शकत नाहीत किंवा जगली तर त्यांचे जगणे त्यांच्याकरता व पालकांकरता क्लेशकारक असते. आता CRISPR या आधुनिक जैवयांत्रिकीमुळे अशा रोगांच्या जनुकांच्या रचनेमध्ये हस्तक्षेप करून निरोगी अर्भक जन्माला घालता येऊ शकते. म्हणून अनेक अभ्यासकांना अशा हस्तक्षेपाला नियंत्रणाखाली परवानगी द्यावी असे वाटते.

१९७८ साली डॉ. स्ट्रेप्टो (Dr. Strepto) आणि एडवर्डस् (Edwards) यांनी शरीराबाहेर स्त्रीबीज व पुरुषबीजांचे मिलन घडवून पहिली कृत्रिम गर्भधारणा यशस्वी केली (In Vitro Fertilization IVF). त्या गर्भाचे रोपण आईच्या गर्भाशयात करण्यात आले आणि ९ महिन्यांनी लुईस ब्राऊन (Louise Brown) ही कन्या जन्माला आली. त्यावेळी असाच गदारोळ उठला होता. याकरता एक नियंत्रण मंडळ नेमण्यात आले आणि त्याच्या चौकटीत राहून या प्रयोगांना जगात परवानगी देण्यात आली. वंध्यत्व असलेल्या काही लाखो जोडप्यांना त्याचा फायदा झाला आहे.

या पुढले क्रांतीकारक पाऊल पडले ते १९९७ साली. नैसर्गिक गर्भधारणेकरता स्त्री व पुरुष बीजाची गरज असते. आज लाखो वर्ष याच पद्धतीनी मानवी प्रजोत्पादन सुरू आहे. Clonning (प्रतिरुपण) या जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून शास्त्रज्ञांनी चक्क अलैंगीक पद्धतीने 'डॉली' नावाच्या मेंढीला जन्म दिला.

(पृष्ठ क्र.४० वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे/अंक १२/डिसेंबर २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | विकासवेध-१०: मागासतेचा मोह | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | दक्षिण आफ्रिकेतील माझे काही शैक्षणिक अनुभव | डॉ. नरेंद्र दा. देशमुख | ५ |
| ४) | मोक्षदायिनी - उज्जयनी | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ८ |
| ५) | भ्रमणध्वनीचे अधिराज्य | गौरी अंबाजी परब | १८ |
| ६) | कोल्हा, शेअरबाजार आणि .... | श्री. चंद्रशेखर टिळक | २० |
| ७) | श्रीलंकेतील घटनात्मक पेचप्रसंग | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | २३ |
| ८) | आमची चारधाम यात्रा - एक अद्भुत अनुभव | चंद्रकांत शिंगाडे | २५ |
| ९) | नाशिक रागमाला : मराठ्यांच्या कलासक्ततेची साक्ष | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# विकासवेध-१०: मागासतेचा मोह

*मागासलेपणावर स्व-उद्यमाने मात करता येते हे उदाहरण देऊन लेखकाने या लेखात स्पष्ट केले आहे. - संपादक*

आपण मागास आहोत ही काय अभिमानाची गोष्ट समजायची? आपण मागास नाही हे अभिमानाने सांगता यावे अशीच इच्छा, आकांक्षा आणि उमेद आपण बाळगायला हवी.

दत्ताजी शिंदे हा मराठ्यांचा शूर सरदार होता. पानीपतच्या युद्धात नजीबखानाने त्याला ठार मारले. मरण्याच्या आगोदर नजीबने त्याला विचारले होते 'क्यूँ पाटील लढोगे?' त्यावर दत्ताजीने दिलेले,- 'क्यूँ नही, बचेंगे तो और भी लढेंगे' हे उत्तर अजरामर झाले आहे. वस्तुतः मृत्यू समोर उभा दिसत असतांनाही प्राणांची भीक मागावी अशी कल्पनाही त्या वीरास शिवली नाही. होत असलेला पराभव ही काही अभिमानाची गोष्ट नव्हती. त्या मागासतेचा त्यास मुळीच मोह नव्हता.

भारतीय राष्ट्रीय खेळाडू असलेल्या अरुणिमा सिन्हाला चोरट्यांनी गाडीतून खाली लोटून दिल्याने, डावा पाय गुडघ्यापासून गमवावा लागला. दिल्लीत शुश्रुषालयात दाखल असतांना कुणीसे तिला उद्देशून म्हणाले की, 'अब ये बेचारी क्या करेगी?' तिला 'बेचारी' शब्द जिव्हारी लागला. ती जिद्दीने पेटून उठली. म्हणाली, 'मैं बेचारी नहीं हूँ ।' त्यानंतर उण्यापुऱ्या दोन वर्षांच्या आतच अरुणिमा हिमालयाच्या सर्वोच्च शिखरावर -सागरमाथ्यावर- जाऊन पोहोचली होती. बेचारीपणाचा फायदा घेऊन सहानुभूती मिळवण्याचे तिच्या मनातही आले नाही. सहानुभूती मिळवणे ही काही अभिमानाची गोष्ट नव्हती. त्या मागासतेचा तिला मुळीच मोह नव्हता.

शीख समुदाय भारतभर विखुरलेला आहे. अनेक प्रांतांत तो अल्पसंख्यही आहे. हा समाज आवडीने सैन्यात भरती होत असतो. अत्यंत कष्टाची कामे स्वखुषीने करत असतो. समाजास भूषणावह कामे करत असतो. तो समाजापाशी आरक्षण मागत नाही. वस्तुतः कुठलीच भीक मागत नाही. भीक मागणे काही भूषणावह नसते. ते असते मागासलेपणाचे लक्षण. अशा दांभिक मागासलेपणाचा मोह ह्या समुदायाला मुळीच नसतो.

जसे शीख तसेच गुरखा. गुरखा लोक दूर नेपाळातून भारतभर येऊन उपजीविका शोधतात. खडतर परिस्थितीतही स्वबळावर राहतात. अत्यंत श्रीमंत वस्त्यांची बखूबी रखवाली करतात. त्यांच्यापाशी ते कधीही दयेची याचना करत नाहीत. ते काम मागतात. निष्ठेने ते पार पाडतात. आपापली उपजीविका कमावून स्वाभिमानाने राहतात. स्वकर्तृत्वावर जे मिळेल त्यात समाधान मानतात. परकर्तृत्वावर सिद्ध झालेली भाजी-भाकरी मागून पोट भरावे हे त्यांच्या गावीही नसते, जे मागासलेपणाचे लक्षण असते. अशा दांभिक मागासलेपणाचा मोह ह्या समुदायाला मुळीच नसतो.

आरक्षण मिळाले की सवलती मिळू लागतात. स्पर्धा कमी होते. कस लागत नाही. अल्पशा स्वबळावर सामाजिक सवलतींची श्रीमंती सजू लागते. स्वबळाचा विकास करण्याचे मनातही येत नाही. मन कमजोर होते. आकांक्षा क्षीण होतात. 'आकांक्षांपुढती जिथे गगन ठेंगणे' म्हणायला वावच राहत नाही. आरक्षणाने मानवी विकासाला मर्यादा पडतात. शतकानुशतकांच्या सामाजिक

ज्याला गवताची भीती वाटते, त्याने कुरणात झोपता कामा नये! - सॅम्युअर पुलमर

शोषणाच्या निरसनार्थ सामाजिक सवलती दिल्या गेल्या तो काळ वेगळा होता. त्या काळास, म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीस आज सत्तर वर्षांहूनही अधिक वर्षे होऊन गेलेली आहेत. भारताने सर्वच क्षेत्रांत स्पृहणीय प्रगती केलेली आहे. वर्ग म्हणून कुणीही शोषित शिल्लक राहिलेला नाही. अशा अवस्थेत निरनिराळ्या समर्थ समाजांनी पुढे येऊन सवलतींची मागणी करावी हे गौरवास्पद नाही. किंबहुना लांछनास्पद आहे. अशा समाजांनी असा मागासलेपणाचा मोह का धरावा? केवळ कष्ट न करता सवलतींचा लाभ मिळावा म्हणून? हे योग्य नाही. भूषणावह तर मुळीच नाही.

आपल्या देशातील सर्वात मोठा व्यवसाय शेतीचा आहे असे म्हटले जाते. त्या अर्थाने शेतकरी हा घरचा कर्ता पुरुष मानला जावा. मात्र त्यालाच आयकर नसावा, ह्याची भलामण आजवर निरपवादपणे सर्वच सत्ताधिष्ठित पक्षांनी केलेली आहे. कर्त्या पुरुषानेच घर चालवण्यात पुढाकार घ्यावा ही मान्यता असलेल्या आपल्या स्वाभिमानी देशातील शेतकरी, हे कसे चालवून घेत आहेत हे समजत नाही. आयकरही मुळात ‘आय’ नसेल तर ‘काय’ नसतो. म्हणजे गरीब शेतकऱ्यांना आयकर भरावा लागेल असे गळे काढण्यात अर्थ नाही. तरीही शेकडो एकर शेती बाळगणाऱ्या पुढाऱ्यांनी, गरीब शेतकऱ्यांच्या नावाने शेतीस आयकरमुक्त व्यवसाय ठेवल्यानेच, शेतकरी नाकर्ते झाले. कर देण्याचे त्यांचे उत्तरदायित्वच नाहीसे झाल्याने, शेतकरी मागास ठरले. मागासलेपणाचा हा हव्यास गरीब शेतकऱ्यांना नाही. तो आहे शेकडो एकर शेती बाळगणाऱ्या त्यांच्या पुढाऱ्यांना. म्हणून गरीब शेतकऱ्यांनीच पुढाकार घेऊन पुढारलेल्या शेतकऱ्यांकडून आयकर वसुली अनिवार्य करण्याचा हट्ट धरला पाहिजे, न पेक्षा त्यांचे नेतृत्व झुगारून दिले पाहिजे. त्यांच्या अट्टाहासाने का उगाच मागास राहायचे? का देशाचे नुकसान करायचे? आपल्या पौराणिक कथांतून मागासलेपणावर मात केलेल्यांच्या कहाण्या सदैव सांगितल्या जातात. त्यात एक असते एकलव्याची कहाणी. राजकुमारांना धनुर्विद्या शिकवणाऱ्या गुरूंनी वनवासी एकलव्यास स्पष्टपणे धनुर्विद्या देण्याचे नाकारले. एकलव्याने त्यांची मनधरणी केली नाही. एकलव्याने त्यांच्या आदर्शांचा पुतळा कल्पून, त्याच्याच साक्षीने धनुर्विद्या अवगत करून घेतली. एवढा पारंगत झाला की, गुरूंना दक्षिणेपोटी त्याच्या उजव्या हाताचा अंगठाच कापून मागावासा वाटला. तोही त्याने निस्सीम गुरूभक्तीपोटी दिला. मात्र एकलव्याने कदापी लाचारी पत्करली नाही. सवलत मागून शिक्षण घेण्याचा विचारही त्याचे मनास शिवला नाही. मागासलेपणावर स्व-उद्यमाने मात करणारा एकलव्यच आज आपल्याला वंदनीय आहे. तोच तर आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहे. त्याचाच वसा आपण घेऊ या.

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

दिशा
नियमित
वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

भीती ही अज्ञानातून निपजते. - इमरसन

# दक्षिण आफ्रिकेतील माझे काही शैक्षणिक अनुभव

*दक्षिण आफ्रिकेतील शैक्षणिक अनुभव या लेखात विशद केले आहेत.- संपादक*

आफ्रिका हा पृथ्वीवर मनुष्यवस्ती असलेला सर्वात जुना भूभाग आहे. आफ्रिकेचा इतिहास म्हणजे मानवाचा इतिहास असे म्हटले जाते. आदिमानवाचा अर्थात होमो इरेक्टसच्या जीवनाचा प्रारंभ १७ लाख ५० हजार वर्षांपूर्वी आफ्रिकेतूनच झाला असे जगभरातील संशोधक मानतात. त्यानंतर आजच्या आधुनिक माणसाचा अर्थात होमो सेपियनच्या जीवनाचा प्रारंभ जवळपास ३० ते ४० हजार वर्षांपूर्वी याच खंडात झाला. येथून पुढच्या काळात उत्तरेला युरोप आणि पूर्वेला आशिया खंडात मानवी वस्ती विस्तारत गेली. 'क्रॅडल ऑफ ह्युमन काईन्ड' (Cradle of Humankind) हे स्थळ यासाठी पाहणे आवश्यक आहे. इजिप्तमध्ये इसवी सनापूर्वी ३३०० वर्षे आधीच्या संस्कृतीचे अवशेष सापडतात. युरोपियांच्या आफ्रिकेतील मोहिमांचा प्रारंभ ग्रीकांपासून झाला. अलेक्झांडर द ग्रेट याने इजिप्तचा बराचसा भाग जिंकून घेतला. त्याने अलेक्झांड्रिया शहरही वसवले.

विषुववृत्ताच्या दोन्ही बाजूंना पसरलेला आफ्रिका हा खंड आहे. आफ्रिकेत विविध भौगोलिक प्रदेश दिसून येतात. उत्तर आणि दक्षिण दोन्ही उष्ण कटिबंध सामावणारा आफ्रिका हा एकमेव खंड आहे. सरीसृपांचे युग अशी ओळख असलेल्या मेसोझोइक काळात म्हणजे सुमारे २५ कोटी ते ६.५ कोटी वर्षांपूर्वीच्या काळात आफ्रिकेत अवाढव्य आकाराच्या प्राण्यांचे अस्तित्व होते. डायनोसॉरचे जीवसृष्टीत प्राबल्य असलेला ज्युरासिक कालखंड याच युगाचा एक भाग होता. त्या काळातील प्राण्यांचे अवशेष आफ्रिकेत अनेक ठिकाणी सापडले आहेत. खंडाच्या पूर्व किनाऱ्यालगत असलेल्या मादागास्कर या प्रचंड बेटवजा देशामध्ये आढळलेल्या डायनॉसॉरसच्या पायांच्या अवशेषावरून, डायनॉसॉरस मांसाहारी होते या कल्पनेला पुष्टी मिळाली आहे.

गुलामगिरीच्या अमानवी प्रथेला आफ्रिकेत मोठा इतिहास आहे. खंडाच्या पूर्व भागात, इसवी सनाच्या दुसऱ्या सहस्रकाच्या सुरुवातीपासून अरबांचा गुलाम व्यापार (अरब स्लाव्ह ट्रेड) चालत होता. सोळाव्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत आफ्रिकेच्या पश्चिम भागातून अटलांटिक स्लाव्ह ट्रेड चालला.एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपातील राजकीय शक्तींनी आफ्रिकेतील वेगवेगळा प्रदेशात आपल्या सत्तेचा विस्तार करणे सुरू केले. त्यासाठी आपापसात संघर्ष झाले. या संघर्षांची परिणती म्हणून संपूर्ण आफ्रिका युरोपीय शक्तिंच्या वसाहतींनी व्यापला. या वसाहतवादातून आफ्रिका खंडातील देश मुक्त होण्याची प्रक्रिया इ.स.१९५३ मध्ये लिबियापासून सुरू झाली. इ.स.१९९३ पर्यंत आफ्रिका खंडातील बहुतांश देश स्वतंत्र झाले.

आफ्रिका हा खंड आकाराने आणि लोकसंख्येने आशियानंतर, क्रमांक दोनचा भौगोलिक खंड आहे. त्याचे जवळच्या बेटांसह एकूण क्षेत्रफळ तीन कोटी दोन लाख चौरस किलोमीटर आहे. हा खंड पृथ्वीचा सहा टक्के पृष्ठभाग व्यापतो. पृथ्वीतलावरील एकूण जमिनीच्या २०.४ टक्के जमीन या खंडात येते. इ. स. २००९ मध्ये आफ्रिकेची लोकसंख्या सुमारे एक अब्ज, म्हणजेच पृथ्वीवरील लोकसंख्येच्या १४.७२ टक्के एवढी होती.

दक्षिण आफ्रिका हा देश आफ्रिका खंडाच्या दक्षिण भागास असून सोने, हिरे या खनिजांसाठी तसेच प्राणी आणि वनस्पती संपत्तीसाठी हा प्रसिद्ध आहे. हा देश समशीतोष्ण कटिबंधात आल्याने येथील हवामान सौम्य व आल्हाददायक आहे. पर्वतीय प्रदेशात रूंदपर्णीय पानझडी वने असून येथील व्हेल्ड पठार गवताळ कुरणांसाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे गवताळ प्रदेशात येथे गेंडे, हत्ती, सिंह यांसारख्या प्राण्यांची संख्या विपुल आहे. येथील किंबले हे शहर हिऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे. या शहरात हिऱ्यांच्या खाणीसाठी खोदलेली विहीर ही भूतलावरील माणसाने खोदलेली विहीर समजली जाते. दक्षिण आफ्रिकेत निग्रो वंशाच्या लोकांमध्ये हौसा, झुलू, स्वाझी, सोथो, आदी प्रमुख जाती आहेत. किनाऱ्याजवळील लोकसंख्या दाट असून पठारी भागात व वाळवंटी भागात लोकसंख्या कमी आहे. या देशातील प्रिटोरिया, जोहान्सबर्ग, केपटाउन, दरबान ही प्रमुख शहरे आहेत.

दक्षिण आफ्रिकेचे गणराज्य हा आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोकाला असलेला एक देश आहे. क्षेत्रफळानुसार आफ्रिका जगात २५ वा आणि लोकसंख्येनुसार २४ वा मोठा देश आहे. दक्षिण आफ्रिकेच्या नैऋत्येस अटलांटिक महासागर व दक्षिण, आग्नेय व पूर्व दिशेला हिंदी महासागर आहे. उत्तरेला नामिबिया, बोत्स्वाना व झिम्बावे हे देश असून ईशान्य दिशेला मोझाम्बिक व स्वाझीलँड हे देश आहेत. लेसोथो हा देश पूर्णपणे दक्षिण आफ्रिकेच्या अंतर्गत आहे. दक्षिण आफ्रिकेला एकुण २,७९८ किमी लांब समुद्रकिनारा लाभलेला आहे. दक्षिण आफ्रिका हा विविध संस्कृती आणि भाषा बोलणाऱ्यांचा बहुवांशिक देश आहे. देशाच्या राज्यघटनेने अकरा भाषा अधिकृत जाहीर केल्या आहेत. डच भाषेपासून विकसित झालेली आफ्रिकान्स ही भाषा बहुतांश लोक बोलतात. सार्वजनिक आणि व्यावसायिक जीवनात इंग्रजी सर्वसाधारणपणे वापरली जाते. प्रिटोरिया (कार्यपालिका), ब्लोमफॉन्टीन (न्यायिक) आणि केपटाऊन (विधी) साठी तर जोहान्सबर्ग सर्वात मोठे दक्षिण आफ्रिकेतील शहर म्हणून प्रसिद्ध आहे. सर्व वांशिक गटांना सामावून घेणारी घटना आधारित लोकशाही, सांसदीय प्रजासत्ताकाची राज्यपद्धती दक्षिण आफ्रिकेच्या लोकांनी स्वीकारली आहे.



दक्षिण आफ्रिकेतील विटवॉटर्झरँड विद्यापीठात जून २०१७- मे २०१८ या एक वर्षाच्या कालावधीत मला पोस्ट डॉक्टरल फेलोशिप मिळाली. या दरम्यान मला जे काही शिकायला मिळाले आणि शैक्षणिक अनुभव आले ते थोडक्यात मांडण्याचा सदर लेखात माझा एक प्रयत्न आहे.

विटवॉटर्झरँड विद्यापीठ हे शैक्षणिकदृष्ट्या दक्षिण आफ्रिकेत चांगल्या उत्कृष्ट दर्जाचे शैक्षणिक पर्यावरण असलेले एकमेव विद्यापीठ समजले जाते. येथे मला वर्षभर 'अध्यापनास आवश्यक विषय विशिष्ट आशय ज्ञान - जैविक विज्ञान' यावर संशोधन करण्याची आणि अध्यापनास उपयुक्त अशा नवनवीन पद्धती शिकण्याची संधी मिळाली. कोणतेही ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे असेल तर शिक्षकाला विषय ज्ञानाबरोबर अध्यापन शास्त्राचे ज्ञानही आवश्यक असते. या संदर्भातील विचार १९८६ ला ली. शुलमन यांनी मांडला. आणि त्यानंतर जगभर यासंदर्भात विविध विषयांमध्ये अनेक शिक्षणतज्ज्ञांनी प्रतिमाने आणि सिद्धांत मांडले. विषयापासून सुरुवात होऊन (संकल्पना) घटकापर्यंतचा आता विषयज्ञानाचा आणि अध्यापन पद्धतीचा विचार

सेवापूर्व आणि सेवांतर्गत या दोन्ही शिक्षणादरम्यान व्हायला लागला आहे.





**शाळाभेटी अनुभव :** दक्षिण आफ्रिकेत शाळांना भेटी द्यायला मिळणे ही बाब आपल्या देशातील शाळांना भेटी देण्यासारखी सोपी गोष्ट नाही. आपल्या देशात सहज आपण शाळेत जाऊन शाळेची माहिती घेऊ शकतो आणि विद्यार्थी व शिक्षकांसोबत चर्चा करू शकतो. बी.एड च्या तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचं पाठ निरीक्षण करण्याची संधी मला मिळाली. बी.एड. ची पदवी ही चार वर्षांची असते आणि त्यामध्ये अनेक विषयात बी.एड. करता येते. उदा. बी.एड. (गणित), बी.एड. (विज्ञान) इत्यादी. बी.एड. चे विद्यार्थी जे सराव पाठ घेतात त्यास 'अध्यापन अनुभव' असे म्हणतात. चार वर्षांच्या बी.एड. मध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांना साधारण दीड महिने हा अनुभव घ्यावा लागतो. माझ्या एका वर्षाच्या कालावधीत मला हा अनुभव घेता आला आणि या दरम्यान मी १३ शाळांना भेटी दिल्या. या प्रत्येक शाळांना मी २-३ वेळा भेट दिली. यामध्ये काही संपूर्णपणे शासकीय, काही खाजगी अशा स्वरूपाच्या शाळा होत्या. काही फक्त मुलींसाठी होत्या तर काही मुलांसाठी, तर बऱ्याचशा दोन्हींसाठी आहेत.









(पृष्ठ क्र.२२ वर)

# मोक्षदायिनी - उज्जयनी

*हिंदू धर्मियांचे पवित्र मोक्षदायी शहर उज्जयनीच्या माहात्म्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

उज्जैन (उज्जयनी) हे शहर भारतातील अनेक प्राचीन शहरांपैकी एक आहे. अभ्यासकांचे मत आहे की, हे शहर पाच हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात असावे. येथील नागर संस्कृतीच्या व शहरीकरणाच्या खूणा साधारणतः इसवीसन पूर्व सातशे वर्षांपासून तर निश्चितपणे मिळतात. इसवीसन पूर्व सहाशेमध्ये तर उज्जैन हे माळवा प्रांतातील अतिशय महत्त्वाचे शहर म्हणून प्रसिद्ध पावले होते. एवढेच नव्हे तर, उज्जैन ही ह्या काळात अवंती ह्या महाजनपदाची राजधानी होती. उज्जैन हे शहर सद्यस्थितीत मंदिरांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे.

हिंदू धर्मग्रंथांनुसार भारतातील सात ठिकाणांना मुक्ती व मोक्षप्राप्ती मिळण्याची ठिकाणे वा स्थळे म्हटलेले आहे, निदान भाविक हिंदू तरी असे मानतात. ही सात शहरे म्हणजे अयोध्या, मथुरा, हरद्वार, काशी, कांची, उज्जैन व द्वारका ही होत. अयोध्या हे स्थळ भगवान विष्णूचा सातवा अवतार श्रीरामाचे जन्मस्थळ मानले जाते. अयोध्या ही श्रीरामाची राजधानी होती. रामाचा अवतार त्रेता युगात होऊन गेला अशी हिंदूंची श्रद्धा आहे. अयोध्या ही नगरी साकेत ह्या नावानेदेखील प्रसिद्ध असल्याचे आपल्या लक्षात येते. अयोध्या शहरातून शरयु नदी वाहते. ही नदी हिंदू धर्मियांसाठी फार पवित्र आहे. मथुरा हे शहरदेखील अयोध्येप्रमाणे भारतातील उत्तरप्रदेश या राज्यात आहे. मथुरा हा जिल्हा पश्चिम उत्तर प्रदेशात असून मथुरा हे शहर ह्या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. मथुरा आग्र्यापासून साधारणतः ५० किलोमीटर उत्तरेला, दिल्लीपासून १४५ किलोमीटर नैऋत्येला तर वृंदावन (येथे श्रीकृष्णाने आपले बालपण-नंद व यशोदेसमवेत व्यतीत केले होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. मथुरा व वृंदावनच्या आसपासच्या भूमिला ब्रजभूमी असेदेखील म्हटले जाते.) पासून साधारणतः ११ किलोमीटर व गोवर्धन (श्रीकृष्णाने बालपणी ब्रजवासीयांचे अतिवृष्टीपासून रक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत आपल्या बोटाने उचलून त्याचे छत्र केले व ब्रजवासियांचे रक्षण केले, अशी कथा आपणास महाभारतात वाचावयास मिळते.) पासून २२ किलोमीटर एवढ्या अंतरावर आहे. भगवान विष्णूचा आठवा अवतार श्रीकृष्णाशी निगडित असे मथुरा हे स्थान आहे. येथून यमुना नदी वाहते. यमुनेच्या तीरावरील श्रीकृष्णाच्या बाळलीला महाभारतात वर्णिलेल्या आहेत. महाभारतातील एका कथेनुसार श्रीकृष्णाने यमुना नदीतच 'कालिया मर्दन' केले होते. अर्थात, कालिया हा महासर्प होता व त्याचे गर्वहरण श्रीकृष्णाने बालपणी केले होते. असो. हरद्वार हे ठिकाण उत्तर भारतातील सध्याच्या उत्तराखंड या राज्यात असून येथे गंगा नदी हिमालयातून मैदानी प्रदेशात प्रवेश करते. हरद्वार हे ठिकाण शैव तसेच वैष्णव या दोन्ही पंथियांसाठी फार पवित्र आहे. असे मानले जाते की, येथे दक्षाने यज्ञ केला होता व सतीमातेने त्या यज्ञात प्रवेश करून स्वतःला भस्म करून घेतले होते. कारण दक्षाने महादेवाला या यज्ञात आमंत्रित केले नव्हते. काशी हे ठिकाण उत्तर प्रदेश या राज्यात आहे. काशी हे बनारस व वाराणसी या नावांनीदेखील प्रसिद्ध असून पवित्र गंगा नदीच्या तीरावर वसलेले भारतातील हे प्राचीन शहर आहे. काशी हे भगवान शिवाचे ठिकाण

म्हणून देखील प्रसिद्ध आहे. त्यामुळेच हिंदीमध्ये 'काशी के कंकर भगवान शिव शंकर' असे म्हटले जाते. कांची हे शहर भारतातील दक्षिणेकडील तमीळनाडू या राज्यात असून येथील भगवान शिवाचे कैलासनाथर हे मंदिर फार प्रसिद्ध आहे. तसेच येथील थिरू परमेश्वरम् विन्नगरम वा वैकुंट पेरूमल हे भगवान विष्णूचे मंदिरदेखील प्रसिद्ध आहे. द्वारका हे शहर गुजरातमधील काठियावाड (सौराष्ट्र) प्रांतात प्राचीनकाळी समुद्रकिनारी होते असे हिंदू मानतात. याचे कारण म्हणजे महाभारतातील मौसल पर्वानुसार अर्जुनाने स्वतः द्वारका ही नगरी समुद्राखाली जाताना पाहिली होती असे हिंदू मानतात. डायना एल्. येक यांनी आपल्या 'इंडिया : अ सेक्रेड जॉग्रफी' या ग्रंथात, अर्जुन द्वारका नगरी समुद्रात बुडतानाचे जे वर्णन करतो त्याचे इंग्रजी भाषांतर पुढीलप्रमाणे पृष्ठ क्रमांक ३८२ वर दिले आहे –

"The Sea, which had been beating against the shores, suddenly broke the boundary that was imposed on it by nature. The sea rushed into the city. It coursed through the streets of the beautiful city. The sea covered up everything in the city. I saw the beautiful buildings becoming submerged one by one. In a matter of a few momements it was all over. The sea had now become as placid as a lake. There was no trace of the city. Dvaraka was just a name; just a memory". – –

कुरुक्षेत्राच्या युद्धानंतर (महाभारताच्या युद्धानंतर) जवळ जवळ ३५ वर्षांनी श्रीकृष्णाचा मृत्यू होतो अशी माहिती आपणास मिळते. श्रीकृष्ण कुरुक्षेत्र युद्धानंतर द्वारका नगरीत आपली प्रजा व आप्तेष्टांसहीत राहायला जातो असे हिंदू धर्मग्रंथांमध्ये म्हटले आहे. ह्या नगरीचे अतिशय सुंदर वर्णन आपणास विविध स्तोत्रांतून वाचावयास मिळते. एका कथेनुसार, श्रीकृष्ण आपल्या मृत्यूपूर्वी द्वारकावासियांना आगाऊ चेतावणी वा सूचना देतो की, त्याच्या मृत्यूपश्चात द्वारका नगरी समुद्राखाली जाऊन वा समुद्राचे पाणी त्यात शिरून ती नष्ट होईल. त्यामुळे त्यांनी या नगरीतून स्थलांतर करावे. असो. हिंदूधर्म ग्रंथांनुसार उज्जैन ही देखील मोक्षदायी नगरी मानली जाते. या सात शहरांमध्ये जर व्यक्तीला मृत्यू आला तर त्यास मोक्षप्राप्ती होते अशी हिंदू भाविकांची श्रद्धा आहे. असो.

पुराणांमधून मिळणाऱ्या माहितीनुसार हैहेय (Haihaya) वंशाचे देखील उज्जैनवर राज्य होते. हैहेय राजवंश हा सोमवंशी असल्याची माहिती महाभारतातून मिळते. तसेच महाभारतानुसार कार्तवीर्य अर्जुन हा ह्या वंशातील प्रसिद्ध राजा होता व त्याने रावणाचा देखील पराभव केला होता. हैहेय राजवंशाचा संबंध यदूराजाशी होता. यदू वंशाचा संदर्भ ऋग्वेदात देखील येतो. श्रीकृष्ण हा यदू कुळातीलच होता. 'महाभारत', 'हरिवंश' व पुराणांनुसार यदू हा ययाती व देवयानीचा पुत्र होता. पुराणांनुसार ययाती हा पुरू वंशातील पहिला राजा होय व तो नहुष हा राजा व त्याची पत्नी अशोकसुंदरी हिचा पुत्र होता. पद्म पुराणातील कथेनुसार अशोकसुंदरी ही भगवान शिव व माता पार्वतीची कन्या होती. ययाती हा पांडवांचा पूर्वज होता अशी माहिती मिळते. आपण येथे थोडक्यात यदू वंशाची चर्चा केली याचे कारण, आपण पुढे श्रीकृष्णाने (यदू वंश) जेथे राहून त्याच्या गुरूकडून म्हणजेच सांदिपनी ऋषींकडून विद्याप्राप्ती केली त्या उज्जैनमधील सांदिपनी ऋषींच्या आश्रमाविषयी माहिती घेणार आहोत. असो.

इसवीसनापूर्वीच्या सहाव्या शतकातील जी सोळा महाजनपदे होती त्यापैकी एक म्हणजे अवंती हे महाजनपद होते. या जनपदाची राजधानी वर नमूद केल्याप्रमाणे उज्जैन हे शहर होते अशी माहिती आपणास काही स्तोत्रांतून मिळते. ह्या सोळा महाजनपदांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – काशी (उत्तरप्रदेश, राजधानी–बनारस), कोसल (पूर्व उत्तरप्रदेश, राजधानी–श्रवस्ती), अंग (बिहार, राजधानी–चंपा), मगध (बिहार,

राजधानी-राजगृह- नंतरच्या काळात-पाटलीपुत्र), वज्जी किंवा व्रिज्जी (बिहार, राजधानी-वैशाली), मल्ल (पूर्व उत्तरप्रदेश, राजधानी-कुशीनगर), चेदी (मध्यप्रदेशातील बुंदेलखंड, राजधानी सुक्तीमती वा सोथीवती), वत्स (उत्तरप्रदेश, राजधानी-कौशंबी), कुरू (हरयाणा-दिल्ली-मीरत-गाझियाबाद-राजधानी-इंद्रप्रस्थ/हस्तीनापूर/इशूकार), पांचाल (उत्तरप्रदेश-रोहीलखंड व उत्तराखंड-राजधानी अहीछत्र/काम्पिल्य), मत्स्य (राजस्थान, राजधानी-विराटनगर), शूरसेन (उत्तरप्रदेश (मथुरा), राजधानी-मथुरा), आसाक (महाराष्ट्र (बुलढाणा), राजधानी-पोटाली, पोटाना वा पोडाना), अवंती (मध्यप्रदेश (माळवा), राजधानी-उज्जैन व महिष्मती), गांधार (अफगाणिस्तान व वायव्य पाकिस्तान, राजधानी-तक्षशिला) व कंबोज (अफगाणिस्तान (हिंदू कुश हिमालय रांगा), राजधानी-राजपूर).

इसवीसनापूर्वीच्या ६ व्या शतकापासून आपणास अवंती अर्थात उज्जैनचा इतिहास खऱ्या अर्थाने मिळण्यास मदत होते. इसवीसनापूर्वी ६ व्या शतकात अवंतीचा राजा प्रदयोत महासेन होता व तो महात्मा गौतम बुद्धांचा समकालीन होता. तद्नंतर ह्या प्रांतावर मौर्य राजघराण्याचेदेखील राज्य होते.

प्राचीन काळात उज्जैनवर मौर्यांप्रमाणेच, त्यांच्या नंतरच्या शुंग व सातवाहन ह्या राजघराण्यांचेदेखील आधिपत्य होते अशी माहिती आपणास मिळते. सातवाहन तसेच शकांमध्ये उज्जैनवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यावरून दीर्घकाळ संघर्ष सुरू होता. सातवाहन साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर इसवीसनाचे दुसरे ते चौथे शतक या कालावधीत उज्जैन हे शहर शकांच्या राज्याचा घटक होते. तद्नंतर गुप्तांनी शकांचा पराभव केल्यानंतर उज्जैन शहरावर गुप्त राजघराण्याचे आधिपत्य प्रस्थापित झाले. गुप्तकालात उज्जैन हे एक गुप्त साम्राज्यातील प्रमुख शहर बनले व ह्या शहराची प्रसिद्धी चोहीकडे पसरली.

कालिदासाने उल्लेख केलेला विक्रमादित्य राजा म्हणजे गुप्तकालीन दुसरा चंद्रगुप्त हाच असावा असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. विक्रमादित्याच्या दरबारात अनेक विद्वान व कवी होते व त्यापैकीच एक कालिदास होता असे म्हटले जाते. असे म्हटले जाते की, इसवी सन ५०० च्या सुमारास माळव्याचे वेगळे राज्य अस्तित्वात आले. इसवीसन ५२८ मध्ये माळव्याचा राजा यशोधर्मन याने 'हून' या परकीय टोळ्यांचा पराभव केला. 'हून' ह्या टोळ्या वायव्य दिशेकडून भारतात घुसल्या होत्या. इसवीसनाच्या ७ व्या शतकात माळवा व उज्जैन हे हर्षवर्धनाच्या साम्राज्याचा घटक बनले. हर्षवर्धन व बादामीच्या चालुक्य घराण्यातील प्रसिद्ध राजा दुसरा पुलकेशी यांच्यातील संघर्ष तर सर्वज्ञातच आहे. असो.

उज्जैनचे वैशिष्ट्य म्हणजे हे ठिकाण हिंदू, जैन व बौद्ध ह्या तिन्ही धर्मांच्या उपासकांसाठी फार पवित्र आहे. वीरशैव ह्या शैव पंथियांसाठीदेखील उज्जैन नगरी फार महत्त्वाची आहे. अवंतीमध्ये भगवान वर्धमान महावीर जैनांनी तपस्या केली होती असे संदर्भही आपणास आढळतात. युआन श्वांग (इसवीसन सुमारे ६०२ ते ६६४) ह्या चीनी बौद्ध भिक्खूने उज्जैन नगरीला भेट दिली होती अशी माहिती आपणास मिळते. काही स्तोत्रांनुसार युआन श्वांगने आपल्या लिखाणात उज्जैनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याचा उल्लेख केला आहे व लिखित स्वरूपातील (ऐतिहासिक) उज्जैनच्या कुंभमेळ्याविषयीचा हा सर्वात जुना संदर्भ वा पुरावा असावा असे काही अभ्यासकांचे मत आहे. युआन श्वांग हा उत्तरेकडील प्रसिद्ध राजा हर्षवर्धन (इसवीसन सुमारे ५९० ते ६४७) याच्या काळात भारतात आला होता. तो धर्माने बौद्ध असल्यामुळे भारतातील विविध बौद्ध विहारांना व महात्मा गौतम बुद्धाच्या जीवनाशी निगडित स्थळांना भेटी देणे, तसेच बौद्ध धर्माशी निगडित लिखित दस्तावेजांचा व धर्मग्रंथांचा अभ्यास करणे हे त्याचे उद्दीष्ट होते. युआन श्वांगच्या काळात उज्जैनमध्ये

तीन ते चार सुस्थितीतील बौद्ध विहार होते व ह्या विहारांमध्ये साधारणतः ३०० च्या आसपास बौद्ध भिख्खू राहत असत. यावरून उज्जैनमध्ये याकाळात हिंदू, जैन व बौद्ध धर्मीय बांधव एकोप्याने व सलोख्याने राहत होते हे सिद्ध होते.

यानंतरच्या काळात उज्जैनवर कलाचुरी, मैत्रक, नंतरच्या काळातील (उत्तरकालीन) गुप्त, पुष्यभूती, प्रतिहार तसेच राष्ट्रकूट नृपतींचे आधिपत्य वा राज्य होते. इसवीसनाच्या १० व्या शतकाच्या उत्तरार्धात परमार राजवंशाने राष्ट्रकुटांविरुद्ध बंड करून माळव्यावर आपले स्वतंत्र राज्य प्रस्थापित स्थापन केले. दुसरा सियक, वाकपती मुंज, सिंधुराज, भोजदेव, उदयदित्य, नरवर्मन हे परमार कुलातील इतर काही राजे होत. परमारांच्या उज्जैन व धार ह्या दोन राजधान्या होत्या.

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात इसवीसन १२३५ मध्ये इल्तुतमिश (अल्तमश) या सुलतानाने उज्जैनवर आक्रमण केले होते व त्यावेळी महाकाल मंदिराची नासधूस करण्यात आली होती अशी माहिती आपणास मिळते. इसवीसन १२०६ मध्ये कुतबुद्दीन ऐबक ह्या मोहम्मद घोरीच्या गुलाम सरदाराने दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना केली. हे भारतातील मुस्लीम राजांचे पहिले राज्य होय असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. कुतबुद्दीन ऐबक नंतर त्याचा गुलाम व उत्तराधिकारी सुलतान अल्तमशने उज्जैनवर हल्ला केला होता. इसवी सनाच्या १४ व्या शतकाच्या सुरुवातीस १३०५ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीच्या काळातदेखील माळव्याच्या राज्यावर मुस्लीम आक्रमण झालेले आपल्या निदर्शनास येते. शेवटी इसवीसन १४०१ मध्ये परमारांच्या सत्तेचा अस्त झाला. तद्नंतर उज्जैन हे शहर मुस्लीम शासकांच्या आधिपत्याखाली गेले.

इसवीसनाचे १५ वे शतक ते १८ व्या शतका दरम्यान मध्य व उत्तर भारताच्या राजकीय पटलावर अनेक नवीन घडामोडी घडून गेल्यावर १७ व्या शतकात उज्जैन शहर पुन्हा एकदा मराठ्यांच्या रूपाने हिंदू शासकांच्या नियंत्रणाखाली आले. मराठा राज्याचे पेशवे थोरल्या बाजीरावांच्या काळात माळवा हा प्रांत त्यांनी मुघलांकडून जिंकून घेतला व राणोजी शिंदे या सरदाराला माळव्याचा सुभेदार बनवले. ह्याच राणोजी शिंदेंनी ग्वाल्हेरच्या संस्थानाची मुहूर्तमेढ रोवली. राणोजी शिंदेंचे घराणे तसे पाहता मुळचे पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कान्हेरखेडा ह्या ठिकाणचे. राणोजी शिंदेंच्या काळात ग्वाल्हेर (माळवा) संस्थानाची राजधानी उज्जैन होती. उत्तर हिंदुस्थानातील हा प्रदेश जिंकण्यात श्रीमंत थोरल्या बाजीरावांचा सिंहाचा वाटा होता यात वाद नाही. मराठा शासनकालात उज्जैनमधील हिंदू सांस्कृतिक जीवनाचे पुनरुज्जीवन होण्यास सुरुवात झाली. तसेच या काळात अनेक मंदिरे बांधली गेली.

मराठा काळातच उज्जैनमधील महाकालेश्वर व हरसिद्धी या प्रसिद्ध मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात आला. सध्याच्या मुख्य बाजारपेठ परिसरात असलेल्या गोपाळ मंदिराचे निर्माण देखील याच काळात झाले. साधारणतः १७५० ते १८१० या कालावधीत ग्वाल्हेरच्या शिंद्यांचे मुख्यालय हे उज्जैन शहरच होते. १८१० मध्ये त्यांनी आपली राजधानी ग्वाल्हेरला हलवली. उज्जैनला अशाप्रकारे इसवीसनपूर्व काल ते आजपावेतो अशा प्रदीर्घ इतिहासाची परंपरा आहे. या एवढ्या हजारो वर्षांच्या काळात उज्जैन नगरीने अनेक स्थित्यंतरे, चढाव-उतार व आक्रमणे पाहिली. येथील अनेक मंदिरांची नासधूस करून ती उद्ध्वस्त करण्यात आली. परंतु उज्जैनमधील सध्याची अनेक मंदिरे पुन्हा एकदा ती मुलतः/मुळात ज्या ठिकाणी होती तेथेच बांधण्यात आली व मराठा शासनकालापासून खऱ्या अर्थाने उज्जैनच्या सांस्कृतिक व धार्मिक इतिहासाला पुन्हा एकदा उजाळा देऊन तो जीवंत ठेवण्याचे मोठे काम करण्यात आले. त्यासाठी ग्वाल्हेरच्या शिंद्यांसोबतच

---

मूर्ख लोक शहाण्यापासून जितका फायदा करून घेतात त्यापेक्षा शहाणे लोक मूर्खापासून जास्त शिकतात! - मार्कस क्युटो

थोरल्या बाजीरावांना त्याचे श्रेय देणे उचीत ठरेल. कारण थोरल्या बाजीरावांनी उत्तर हिंदुस्थानातील धडाकेबाज मोहीम हाती घेतली नसती तर हे शक्य नव्हते यात वाद नाही. त्यामुळे सद्यस्थितीत उज्जैनमध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील संस्कृतींचा व मंदिरांचा मेळ झाला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

उज्जैन म्हटले की, तेथील विविध मंदिरांचा उल्लेख करणे क्रमप्राप्तच आहे. किंबहुना, उज्जैन शहराची ओळख मुळात 'मंदिरांचे शहर' म्हणूनच आहे हे आपण पाहिलेलेच आहे. उज्जैनमधील सर्वात प्रसिद्ध असे मंदिर म्हणजे महाकालेश्वराचे शिवमंदिर होय असे म्हणणे वावगे ठरू नये. महाकालेश्वर मंदिरात भगवान शिवाची पूजा शिवलिंग स्वरूपात होते. येथील शिवलिंग हे स्वयंभू असल्याची भक्तांमध्ये श्रद्धा आहे. महाकालेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे. महाकालेश्वर मंदिराचे संदर्भ पुराणांमध्ये तर आढळतातच परंतु कालिदासासारख्या महाकवीने देखील महाकालेश्वराचा उल्लेख आपल्या संस्कृत काव्यांमध्ये केला असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. महाकालेश्वर याचा अर्थ 'काळाहूनही महान' असा व 'काळाचाही स्वामी असणारा तो भगवान शिव' असा होतो. येथील महाकालेश्वराच्या ज्योतिर्लिंगावर पुजारी भस्माच्या सहाय्याने महाकालेश्वराची प्रतिमा लीलया साकारतात. ही प्रतिमा दक्षिणामुखी असून उग्र असते व ती भाविकांचे लक्ष वेधून घेते. महाकालेश्वराचे मंदिर तीन मजली असून येथे भगवान शिवाची म्हणजेच शिवलिंगावर साकारलेली ओंकारेश्वराची प्रतिमा देखील असून गर्भागारात अनुक्रमे पश्चिम, उत्तर व पूर्व दिशेला गणेश, पार्वतीमाता व कार्तिकेयाच्या मूर्ती आहेत. येथे नंदीचीदेखील प्रतिमा असून तिसऱ्या मजल्यावर नागचंद्रेश्वराची मूर्ती असून या मूर्तीचे दर्शन फक्त नागपंचमीच्या दिवशीच घेता येऊ शकते. महाशिवरात्रीच्या दिवशी महाकालेश्वर मंदिरात फार मोठी जत्रा भरत असते. महाकालेश्वर मंदिराचा इतिहास प्राचीन आहे यात वाद नाही. ह्या मंदिराविषयी अशी कथा सांगितली जाते की, रतनमाल पर्वतावर निवास करणाऱ्या एका दानवाने / आसुराने एकदा उज्जैनवर म्हणजेच अवंतीवर हल्ला करून एका ब्राह्मणाची त्याला अग्नीत टाकून हत्या केली. त्यामुळे भगवान शिवाने क्रोधीत होऊन आपले त्रिनेत्र उघडले व त्या आसुरास भस्म केले. तेथे एक शिवलिंग अवतीर्ण झाले व त्याच ठिकाणी महाकालेश्वराचे मंदिर बांधण्यात आले. ह्या मंदिराचा उल्लेख आदिब्रह्म पुराणात देखील आढळतो. हिंदू धर्मियांची एकूण अठरा पुराणे असून यातील एक पुराण म्हणजे ब्रह्मपुराण होय. ब्रह्म पुराणालाच सौर्य पुराण व आदिब्रह्मपुराण असे म्हटले जाते. असो.

आपण अगोदर पाहिलेलेच आहे की, एकंदरीतच माळवा व उज्जैनवर अनेक राजघराण्यांनी व इतिहास प्रसिद्ध राजांनी शासन केले. अशाच एका राजांपैकी एक म्हणजे विक्रमादित्य हा राजा होय. 'वेताळ पंचविशी' व 'सिंहासन बत्तीशी' ह्या संस्कृत ग्रंथांमधील लोककथांचा नायक म्हणजे हा उज्जैनचा विक्रमादित्य होय असे म्हणतात. अभ्यासकांमध्ये विक्रमादित्याच्या कालावरून दुमत असल्याचे निदर्शनास येते. एका मतप्रवाहानुसार ह्या विक्रमादित्य राजाने इसवीसनपूर्व ५७ मध्ये शकांचा पराभव करून विक्रम सामवताची सुरुवात केली. तर काही इतिहासकारांच्या मते गुप्तकालीन दुसरा चंद्रगुप्त ह्या सम्राटावरच लोकप्रिय कथांतील विक्रमादित्य बेतलेला असावा. याचे कारण दुसऱ्या चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' हा किताब घेतला होता. असो. तर आपणास काही कथांमधून व स्तोत्रांमधून अशी माहिती मिळते की, विक्रमादित्य हा राजा उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिरात दररोज नित्यनेमाने जात असे व शिवलिंगाची मनोभावे व भक्तिभावाने पूजा करत असे. त्याचप्रमाणे विक्रमादित्य महादेवाच्या पिंडीवर बेलपत्र वाहून आपल्या प्रजेच्या सुखशांतीसाठी प्रार्थना करत असे.

जो स्वतःला शहाणा समजतो, तो खरोखरच एक नंबरचा मूर्ख असतो! – वोल्टेर

मुस्लीम आक्रमणांमुळे महाकालेश्वर मंदिराची नासधूस झाल्याचे आपण पाहिलेलेच आहे. परमार कुळातील शिलादित्य राजाचा मंडूच्या सुलतानांनी पराभव केल्यानंतर उज्जैन शहर मुस्लीम वर्चस्वाखाली गेले. अल्लाउद्दीन खिलजीने (दिल्लीची सुलतान) सुद्धा उज्जैन काबीज केल्याची माहिती मिळते. मुघलांच्या काळात अकबराने उज्जैनवर आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याची माहिती सापडते. अकबराने उज्जैन शहराचे शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी संरक्षक भिंत बांधली होती असे म्हणतात.

आपण अगोदर नमूद केलेले आहेच की, मराठ्यांच्या काळात थोरल्या बाजीरावांच्या नेतृत्वाखाली उज्जैनवर मराठ्यांचे राज्य प्रस्थापित झाले व थोरल्या बाजीरावांनी राणोजी शिद्यांना उज्जैनच्या प्रशासनाची जबाबदारी दिली. राणोजींचा दिवाण सुखटनकर रामचंद्रबाबा शेणवी याने इसवीसनाच्या अठराव्या शतकात महाकालेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केल्याची माहिती आपणास मिळते.

उज्जैनमधील सध्याचे महाकालेश्वर मंदिर हे तीन मजली असून येथे खालच्या, मधल्या व वरच्या मजल्यावर अनुक्रमे महाकालेश्वर, ओमकारेश्वर व नागचंद्रेश्वर ही शिवलिंगे आहेत. येथील ओमकारेश्वर महादेवाची पूजा-अर्चा दशनामी साधू/संन्यासी करत असतात. दशनामी संन्यासांचा पंथ/संप्रदाय इसवी सनाच्या ८ व्या शतकात शंकराचार्यांनी स्थापन केला असे अभ्यासक म्हणतात. यांना एकदंडी असे देखील म्हणतात. दशनामी संप्रदायातील हिंदू व साधू पुढील कुठल्यातरी एका पंथातील असतात असे तज्ज्ञ म्हणतात. हे दहा पंथ पुढीलप्रमाणे होत - अरण्य, आश्रम, भारती, गिरी, पर्वत, पुरी, सरस्वती, सागर, तीर्थ व वन.

दशनामी साधू भगवे वस्त्र परिधान करतात. गळ्यात रुद्राक्षांची माळ घालतात व त्यांच्या कपाळावर भस्माचे त्रिपूंड असते. ह्या साधूंचे केस व दाढ्या साधारणतः वाढलेल्या असतात. काही दशनामी साधू नग्नावस्थेत राहतात. या साधूंना 'नागा साधू' असे देखील म्हटले जाते. आपण वर उल्लेखिलेल्या दहा संप्रदायांपैकी गिरी, तीर्थ व भारती संप्रदायातील साधू शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या श्रींगेरी पीठाशी (कर्नाटक) संलग्न असतात. तीर्थ व आश्रम संप्रदाय द्वारका पीठाशी संलग्न असतो. गिरी, पर्वत व सागर हे संप्रदाय ज्योतीर्मठ (बदरीनाथ) पीठाशी तर वन व अरण्य संप्रदाय गोवर्धन मठाशी (पुरी-ओडिशा) संलग्न असतात असे अभ्यासक म्हणतात. तर आपला मुद्दा असा होता की, ओमकारेश्वर महादेवाची पूजा दशनामी साधू करत असतात. महाकालेश्वर मंदिरातील ओमकारेश्वर शिवलिंग म्हणजे नर्मदेकाठच्या ओमकारेश्वर येथील ज्योतीर्लिंगाचे प्रतिरूप असल्याचे भाविक मानतात. महाकालेश्वर देऊळ समुहात एक मोठे कुंड असून त्यास 'कोटी तीर्थ' असे म्हणतात. महाकाल मंदिरात महाकाल, गणेश (गणपती), पार्वतीमाता व कार्तिकेय या देवता एका ओळीने आहेत. आपणास अशी माहिती मिळते की, मुघल सम्राट औरंगजेबाने महाकाल मंदिरातील दीप कायम तेवत राहण्याच्या दृष्टीने आर्थिक तरतूद करणारी एक सनद वा राजाज्ञा काढली होती. हे वाचून आपणास आश्चर्य वाटणे साहजिक आहे. याचे कारण असे की, मुघल सम्राट औरंगजेब हा अतिशय कर्मठ व कडवा सुन्नी मुसलमान होता. तो अगदी शिया पंथीय मुसलमानांना देखील 'काफीर' धर्मविरोधी (अर्थात इस्लामविरोधी) मानत होता. त्याच्या दृष्टीने संगीत व गायन कलासुद्धा इस्लामविरोधी होत्या. असे असूनही औरंगजेबाने महाकालेश्वर मंदिराच्या दिवा-बत्तीची सोय करण्याचा हुकूम काढावा याचे आश्चर्य वाटते. कारण महाकालेश्वर मंदिर तर हिंदुस्थानातील हिंदूंचे म्हणजेच त्याच्या दृष्टीने 'काफीरांचे' मंदिर होते. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, महाकालेश्वरानेच त्यास तशी बुद्धी दिली असावी व औरंगजेबाच्या ह्या कृत्यावरून साधारणतः ३००

वर्षांहून अधिक काळापूर्वी देखील 'महाकालेश्वर' मंदिराचा व उज्जैनचा महिमा सर्व भारतभर होता. महाकालेश्वर मंदिरातील नंदीची मूर्तीदेखील सुंदर असून काही काळापूर्वी ह्या मूर्तीवर चांदीचा पत्रा चढवलेला आहे. येथे श्रीराम व अवंतिका देवीची देखील पूजा केली जाते. अवंतिका माता म्हणजे सती मातेचेच (पार्वती माता) एक रूप होय. तसे पाहता शिप्रा नदीच्या तीरावर असलेल्या भैरव पर्वत टेकड्यांवर अवंतिका मातेचे मंदिर असून हे एक शक्तीपीठ आहे. येथे सती मातेचा ओठ गळून पडला होता असे म्हणतात. ह्या मंदिरात सती मातेला अवंतिकामाता तर भगवान शिवाला लंबकर्ण भैरव म्हटले जाते अशी माहिती आपणास मिळते.

महाकालेश्वर मंदिर परिसरातच दक्षिणेकडच्या दिशेला शिंद्यांच्या काळात बांधलेली अनेक छोटी मंदिरे आहेत. यापैकी वृद्ध महाकालेश्वर अनादी कल्पेश्वर व सप्तर्षी ही मंदिरे नजरेत भरण्यासारखी आहेत. महाकालेश्वर मंदिरातील शिवलिंग (ज्योतिर्लिंग) प्रचंड आहे. ह्या मंदिरातील ज्योत (दिवा) अखंडपणे तेवत असते. अभ्यासकांचे असे मत आहे की, महाकालेश्वर मंदिर म्हणजे भूमीज मंदिरशैली व चालुक्य व मराठाकालीन मंदिर स्थापत्यशैलींचे मिश्रण होय. महाकालेश्वर मंदिराच्या शिखराचा कळस सोन्याने मढवलेला आहे. महाकालेश्वर मंदिर हे स्थापत्य शास्त्रीय दृष्टीने अतिशय सुंदर असून येथे राजपूत तसेच मुघल स्थापत्य शैलीचा देखील मेळ झालेला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. उज्जैन व माळव्याच्या प्रदेशावर मराठ्यांचे आधिपत्य स्थापन झाल्यावर त्यांनी महाकालेश्वर मंदिर परिसरात अनेक देवळे बांधली. त्याचप्रमाणे अभिषेक, आरती, सावर-म्हणजेच श्रावण महिन्यातील मिरवणूक, हरिहर मिलन इत्यादी धार्मिक परंपरांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. आजही येथे भस्म आरती (सकाळी) होते. तसेच महाशिवरात्री, पंचक्रोशी यात्रा, सोमवती अमावस्या हे सण उत्साहाने साजरे केले जातात. मध्य प्रदेश राज्याच्या सरकारने महाकालेश्वर मंदिराची वेळोवेळी काळजी घेतलेली जाणवते. कुंभमेळ्यापूर्वी व कुंभमेळ्या दरम्यान तर सरकारी यंत्रणेद्वारे भाविकांसाठी विशेष सुविधा पुरविल्या जातात. महाकालेश्वर मंदिराला 'भूतलावरील वैकुंठ' म्हटले जाते.

महाकालेश्वर मंदिर परिसरात अगोदर नमूद केल्याप्रमाणे अनेक लहान देवळे व मंदिरे आहेत. याच मंदिरांपैकी एक म्हणजे लक्ष्मी-नरसिंह मंदिर होय. स्कंद पुराणातील कथेनुसार हिरण्यकश्यपूचा वध केल्यानंतरही नरसिंहाचा क्रोध शांत झाला नाही तेव्हा भगवान शिवाने नरसिंहाला येथे येण्यास सांगितले व तेव्हा त्याचा क्रोध शांत झाला. या मंदिरात नरसिंह, माता लक्ष्मी व भक्त प्रल्हादाच्या मूर्ती असून येथे वैशाख शुक्ल चतुर्दशीला नरसिंहाची विशेष पूजा केली जाते. लक्ष्मी नरसिंह मंदिरापासूनच जवळ रिद्धी-सिद्धी गणेश मंदिर आहे. विशेषतः बुधवारी या मंदिरात भक्तगण दर्शनासाठी मोठ्या संख्येने येतात. येथेच असलेले अजून एक मंदिर म्हणजे विठ्ठल पंढरीनाथ मंदिर होय. या मंदिरात रुक्मिणी, गरुड, राधा व विठ्ठलाच्या प्रतिमा आहेत. श्रीराम दरबार मंदिरात भगवान राम, लक्ष्मण, सीता माता व हनुमानाच्या मूर्ती असून हे मंदिर संगमरवरात बांधलेले आहे. या मंदिरात ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज आले होते असे म्हटले जाते. येथील अवंतिका देवीचे मंदिर देखील प्रसिद्ध असून येथे नवरात्रौत्सवात मंदिराची सजावट केली जाते व तेलाचे दिवे लावून झगमगाट केला जातो. स्कंद पुराणात उज्जैनमधील एकूण ८४ मंदिरांचे वर्णन केले आहे अशी माहिती आपणास मिळते. येथील चंद्रादित्येश्वर मंदिरदेखील ह्याच ८४ मंदिरांपैकी एक होय असे भक्तगण मानतात. या मंदिरात आदि शंकराचार्यांची मूर्ती आहे. आदि शंकराचार्यांनी उज्जैनलादेखील भेट दिली होती अशी माहिती आपणास मिळते. येथे असलेले अजून एक मंदिर म्हणजे मंगलनाथ मंदिर होय. मंगलनाथ मंदिरात मंगळ ग्रहाची पूजा

सूड घेण्यापेक्षा क्षमा करणे जास्त चांगले. - पिटॅकस

शिवलिंगाच्या स्वरूपात केली जाते. येथील अन्नपूर्णा मंदिर हे जवळ-जवळ १०० वर्षे जुने असून येथे अन्नपूर्णादेवी व्यतिरिक्त गोरा भैरव व काळा भैरवाच्या मूर्ती आहेत. अन्नपूर्णामाता ही पार्वती मातेचेच रूप असून ती अन्न व पोषणाची देवी होय. येथील गणपतीचे अजून एक मंदिर म्हणजे रिद्धी-सिद्धी विनायक मंदिर होय. येथील गणेशाची मूर्ती साधारणतः १९ व्या शतकातील असावी असे म्हटले जाते. रिद्धी-सिद्धी विनायक मंदिराजवळच साक्षी गोपाळ मंदिर आहे. असे म्हटले जाते की, महाकालेश्वराचे दर्शन घेतल्यावर गोपाळ मंदिरात दर्शन घेणे आवश्यक आहे. कारण महादेव समाधीतून बाहेर आल्यावर गोपाळजी हे कोण कोण भक्त दर्शनाला आले त्याची साक्ष महादेवाला देतात.

समर्थ रामदासांनी येथील संकटमोचन सिद्धदास हनुमान मंदिर बांधल्याचे म्हटले जाते. हे मंदिर महाकालेश्वर मंदिराच्या वायव्येला आहे. या मंदिरात भाविक मंगळवारी व शनिवारी मोठ्या संख्येने येत असतात. संकटमोचन हनुमान मंदिराच्या विरुद्ध दिशेलाच स्वप्नेश्वर महादेव मंदिर आहे. महादेवाचे हे मंदिर देखील उज्जैनमधील ८४ महादेव मंदिरांपैकी एक आहे. स्कंद पुराणातील कथेनुसार स्वप्नेश्वर महादेवाचे दर्शन घेतल्यावर वाईट स्वप्ने पडत नाहीत. महिन्यातील पंधरवड्यांच्या आठव्या व चौदाव्या दिवशी ह्या मंदिरात विशेष पूजा केली जाते. स्वप्नेश्वर महादेव मंदिराच्या उत्तरेला बृहस्पतेश्वर महादेव मंदिर आहे. येथे महादेवाची पूजा शिवलिंगाच्या स्वरूपात होते. महाकालेश्वर मंदिराच्या मागे त्रिविष्टपेष्वर महादेव मंदिर असून ते प्राचीन असल्याचे म्हटले जाते. हे देखील उज्जैनमधील ८४ शिवमंदिरांपैकी एक असल्याची भक्तांमध्ये भावना आहे. महाकालेश्वर मंदिराच्या नजीकच असलेले अजून एक मंदिर म्हणजे नवग्रह मंदिर होय. येथे नवग्रहांची पूजा शिवलिंगाच्या स्वरूपात होते. येथे जवळपास २०० वर्ष जुने असे मारुतीनंदन हनुमान मंदिर देखील असून हे मंदिर महाकालेश्वर मंदिर परिसरात एका पिंपळाच्या झाडाखाली आहे. महाकालेश्वर मंदिरा नजीकचे अजून एक महादेवाचे मंदिर म्हणजे नीलकंठेश्वर मंदिर होय. नीलकंठेश्वराची पूजा दुःख व यातनांतून मुक्ती मिळण्यासाठी केली जाते. नीलकंठेश्वर मंदिराजवळच खंडेरावाचे मंदिर आहे. आपणास ठाऊकच आहे की, खंडोबा ही महाराष्ट्रातील लोकप्रिय लोकदेवता आहे. महाराष्ट्रात जेजुरी व पाली येथे दरवर्षी लाखो भक्तगण खंडोबाच्या दर्शनासाठी जात असतात. असो. उज्जैनमधील हे खंडेरावाचे मंदिर देवासच्या राजाने बांधले होते. गोविंदेश्वर महादेव मंदिर हे येथील अजून एक महत्त्वाचे शिवमंदिर होय. महाकालेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ सूर्यमुखी हनुमान मंदिर आहे. कोटी तीर्थाच्या उत्तरेला लक्ष्मी प्रदत मोक्ष गणेश मंदिर असून हे उज्जैनमधील प्रसिद्ध अशा सहा विनायक मंदिरांपैकी एक मंदिर आहे. ८४ महादेव मंदिरांपैकी अजून एक मंदिर म्हणजे स्वर्णजलेश्वर मंदिर होय. स्वर्णजलेश्वराची उपासना केल्यावर व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात अशी भक्तांमध्ये श्रद्धा आहे. कोटी तीर्थाच्या ईशान्येला शनी मंदिर आहे. येथे महाकालेश्वराचा एक गण असलेल्या कोटेश्वराचे मंदिर असून प्रदोषाच्या दिवशी महाकालेश्वर मंदिरातील सायंकाळच्या पूजे अगोदर कोटेश्वर मंदिरात पूजा केली जाते. महाकालेश्वर मंदिराच्या मागच्याच बाजूला हिंदू पौराणिक कथांतील सप्तर्षींचे (सात ऋषी- अत्री, भारद्वाज, गौतम, जमदग्नी, कश्यप, वशिष्ठ व विश्वामित्र) मंदिर आहे. ऋषी पंचमीच्या दिवशी तसेच रक्षाबंधनाच्या दिवशी येथे उत्साहाने पूजा केली जाते. स्कंद पुराणातील ८४ महादेव मंदिरांपैकी एक अनादीकल्पेश्वर महादेव मंदिर सप्तर्षी मंदिराच्या विरुद्ध दिशेने आहे. येथेच भगवान विष्णू व ब्रह्मदेवाने ज्योतिर्लिंगाचा अनुक्रमे अंत (जमिनीत) व टोक (आकाशात) शोधण्याचा विफल प्रयत्न केला होता. भगवान विष्णूने आपण अंत शोधण्यात असफल झालो

---

क्षमा करणे ही मृदू स्वभावाची साक्ष आहे, तर सूड घेणे हे जंगलीपणाचे लक्षण आहे. - एपिक्टेटरस

हे मान्य केले. परंतु विधात्याने 'आपण टोक शोधून काढले' असे खोटे सांगितले. त्यामुळे महादेवाने क्रोधीत होऊन ब्रह्मदेवाचे एक शिर कापले व गाय व केवड्याला (फुल) देखील शाप दिला अशी कथा सांगितली जाते. श्रीबाल विजयमस्त हनुमान मंदिरात हनुमान अष्टमी व हनुमान जयंतीच्या दिवशी अभिषेक करून विशेष पूजा केली जाते. दर मंगळवारी व शनिवारी येथे हनुमानाला शेंदूर लावून पूजा केली जाते. ओमकारेश्वर महादेव मंदिर देखील येथील एक महत्त्वाचे मंदिर आहे. वृद्धकालेश्वर महाकाल मंदिरातील शिवलिंगाचे दर्शन महाकालेश्वर मंदिरातील ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यापूर्वी घेतले जाते. अशातऱ्हेने उज्जैनमध्ये महाकालेश्वर मंदिर समूह वा विविध मंदिरांचा परिसर हा खूप मोठा असून उज्जैनमध्ये महाकालेश्वर मंदिरा व्यतिरिक्त जवळ जवळ २९ प्रमुख मंदिरे आहेत व विविध देव-देवतांच्या अनेक सुंदर व सुबक मूर्त्या आहेत.

महाकालेश्वर मंदिरात दररोज पुढील आरत्या व विधी होतात - भस्म आरती - सकाळी ४.०० ते ६.०० दरम्यान (भस्म आरती दरम्यान गाईच्या शेणाला जाळून बनविलेले भस्म वापरले जाते), नैवेद्य आरती - सकाळी ७.३० ते ८.१५ दरम्यान, सकाळची पूजा - सकाळी ७.०० ते ७.३०, मध्यान्ह (दुपार) पूजा सकाळी -१०.०० ते १०.३०, अभिषेक - सायंकाळी ५.०० वाजता, सायंकाळची आरती-संध्याकाळी ६.३० ते ७.०० दरम्यान, शयन आरती- रात्री १०.३० वाजता व दररोज मंदिर बंद होण्याची वेळ रात्रीचे ११.०० वाजता ही असते. उन्हाळ्यात सकाळची आरती- सकाळी ७.०० ते ७.४५ दरम्यान होते तर सायंकाळची आरती-संध्याकाळी ७.०० ते ७.३० दरम्यान होते. महाकालेश्वर मंदिरात नित्य नेमाने पुढील पूजा व अनुष्ठाने केली जातात - जलाभिषेक, पंचामृत पूजा, रुद्र अष्टाध्यायी, लघुरुद्र, महारुद्र, महामृत्यूंजय मंत्र व हवनासोबत अभिषेक. महाकालेश्वर मंदिरात साजरे होणारे महत्त्वाचे सण म्हणजे नित्य यात्रा, श्रावण महोत्सव, हरिहर मीलन, नरक चतुर्दशी, उमा सांझी महोत्सव, प्रदोष, महाशिवरात्री, नागपंचमी इत्यादी होत.

उज्जैनमधील सर्वात प्रसिद्ध असे मंदिर म्हणजे महाकालेश्वराचे मंदिर होय यात वाद नाही. परंतु महाकालेश्वरासोबतच येथे इतरही अनेक मंदिरे आहेत. यातील काही प्रमुख मंदिरे पुढीलप्रमाणे आहेत - काळभैरव मंदिर, चिंतामण गणेश मंदिर, गडकालिका मंदिर, हरसिद्धी मंदिर इत्यादी. आपल्या आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात येते की, उज्जैन ही खऱ्या अर्थाने 'मंदिर नगरी' होय.

आपण अगोदर म्हटलेलेच आहे की, उज्जैन येथे कुंभमेळा भरत असतो. समुद्रमंथना नंतर ज्या चार ठिकाणी अमृताचे थेंब सांडले/पडले तेथे कुंभमेळा भरत असतो अशी पौराणिक कथा आहे. ही चार ठिकाणे म्हणजे हरद्वार (उत्तराखंड - गंगेच्या तीरावर), अलाहाबाद सध्याचे प्रयाग (उत्तर प्रदेश-गंगेच्या तीरावर), त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र-नाशिक जिल्हा-गोदावरीच्या तीरावर) व उज्जैन-(मध्यप्रदेश-शिप्रा नदीच्या तीरावर) ही होत. उज्जैनमध्ये दर बारा वर्षांनी शिप्रेच्या तीरावर कुंभमेळा भरत असतो. कुंभमेळ्यादरम्यान भारतभरातून भाविक व विविध संप्रदायाचे साधू शिप्रेत पवित्र स्नान करण्यासाठी येतात. हिंदू संस्कृतीत नद्यांना फार पवित्र मानलेले आहे. नद्यांना देवीचे रूप म्हटले गेले आहे. शिप्रेविषयीची कथा प्रस्तुत लेखकाच्या 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' ह्या लेखात (दिशा सप्टेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१८) दिलेली आहे. शिप्रा या शब्दाचा अर्थ पवित्रता व शुद्धता होतो. शिप्रा नदीवर उज्जैनमध्ये अनेक घाट असून ह्या घाटांवर कुंभमेळ्यादरम्यान भाविक स्नान करत असतात. कुंभमेळ्यादरम्यानची विविध साधुंच्या आखाड्यांची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत - नागा

जर लोकांनी तुम्हाला क्षमा करावी असे वाटत असेल, तर इतरांना क्षमा करायला शिका. - सिनेका

साधू - दत्त आखाडा, नृसिंह घाट - परमहंस साधू, गडकालिका मंदिर - नागपंथी साधू, गोमती कुंड - वल्लभ संप्रदायाचे पुष्टीमार्ग साधू, अंकपड-वैरागी साधू, मंगलनाथ मंदिर - त्यागी आखाड्याचे साधू, राणिका बाग - दादू पंथी साधू, कबीर पंथी साधू व रामस्नेही पंथी साधू, हनुमंथ बाग - उदासी संत साधू, मुल्लमदारी का बाग, नानक पंथी साधू व मुल्लपुरा - स्वामी नारायण साधू व प्रजापिता ब्रह्मकुमारी साधू. कुंभमेळा म्हणजे भक्तांसाठी उज्जैनमधील पर्वणी होय. कुंभमेळ्या दरम्यान उज्जैनमध्ये अनेक भाविक व साधू येतात व मेळ्यादरम्यान शहरात सजवलेले हत्तीदेखील फिरवले असतात.

उज्जैनमध्ये साजरे होणारे इतर काही महत्त्वाचे सण व यात्रा म्हणजे जन्माष्टमी, दसरा, दिवाळी, धनत्रयोदशी, नवरात्रौत्सव, कार्तिकमेळा, गंगादसरा मेळा, सोमवती व शनिशेहरी अमावस्या स्नान व मेळा, पंचक्रोशी यात्रा, चारद्वार यात्रा, सप्तसागर व चौरासी महादेव यात्रा. येथील सप्तसागर यात्रेचा महिमा पुराणांमध्ये गायिलेला आहे. उज्जैनमधील महत्त्वाचे सात तलाव (तीर्थ) पुढीलप्रमाणे आहेत - रुद्र सागर, पुष्कर सागर, क्षीर सागर, गोवर्धन सागर, विष्णु सागर, पुरुषोत्तम सागर व रत्नगार सागर. एकेकाळी या तलावांमध्ये खूप पाणी होते. परंतु आता या तलावांमधील पाणी आटून कमी झाले आहे.

आपण पाहिलेच आहे की, उज्जैनचा इतिहास फार प्राचीन असून इसवीसनापूर्वी ६ व्या शतकापासून तर उज्जैनचा विविध स्तोत्रांतून वारंवार उल्लेख आलेला आपण पाहतो. उज्जैनने प्रदीर्घ अशा पाच हजार वर्षांच्या कालावधीत अनेक राजकुलं व राजे-महाराजे पाहिले. अनेकदा उज्जैनवर हिंदू राजांचे वर्चस्व होते तर मध्ययुगीन काळात काहीकाळ उज्जैन मुस्लीम आमदनीखाली देखील होते. परंतु १८ व्या शतकापासून पुन्हा एकदा उज्जैन मराठ्यांच्या रुपाने हिंदू राजव्यवस्थेखाली आले. उज्जैनमधील अनेक मंदिरे काळाच्या ओघात नष्ट झाली व काही मंदिरांना परधर्मीय आक्रमकांच्या आक्रमणाला बळी पडावे लागले. त्यामुळे उज्जैनमधील सध्याची अनेक मंदिरं त्यांच्या ऐतिहासिक मूळ अशा ठिकाणी पुन्हा नव्याने बांधण्यात आली आहेत असे अभ्यासकांचे मत आहे. याचा एक दाखला म्हणजे, गुप्तकालीन प्रसिद्ध संस्कृत कवी व पंडित कालिदासाने आपल्या 'मेघदूत' या काव्यात महाकालेश्वर मंदिराचे वर्णन केले आहे. त्याने महाकालेश्वर मंदिराचा उल्लेख 'निकेतन' असा केला आहे. यावरून कालिदासाच्या काळात महाकालेश्वर मंदिरावर शिखर वा कळस नसावा व ते मंदिर 'स्वर्गमंडप' प्रकारातील असावे असा अंदाज बांधावा लागतो.

(क्रमशः)

**संदर्भ :**


- इंडिया - सेक्रेड जॉग्रफी - डायना एल्. येक
- इंडिया - अ हिस्ट्री फ्रॉम द अर्लियस्ट - जॉन की सिव्हिलायझेशन्स टू द बूम ऑफ द व्टेंटी फर्स्ट सेंच्युरि
- उज्जैन - द सिटी ऑफ टेम्पल्स : डॉ. एम्. के पाल
- विश्वकोश : खंड - २
- भारतीय संस्कृतिकोश : प्रथम खंड


**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

# भ्रमणध्वनीचे अधिराज्य

*भ्रमणध्वनीचे फायदे व अतिरेकी वापराचे परिणाम या लेखात विशद केले आहेत - संपादक*

आज भ्रमणध्वनीविना कुणाचे पानही हलत नाही. मोटोरोला ही हँडहेल्ड भ्रमणध्वनी निर्मित करणारी पहिली कंपनी होती. ३ एप्रिल १९७३ मध्ये मोटोरोलाचे संशोधक आणि कार्यकारी मार्टिन कूपर यांनी पहिला 'मोबाईल टेलिफोन' तयार केला जो 'वायरलेस' असल्याने कुठेही वापरता येणे शक्य होते. १९७९ मध्ये 'निप्पोन टेलिग्राफ (तार) आणि टेलिफोन' (NTT- जपान ) यांनी जपानमध्ये पहिले सेल्युलर नेटवर्क सुरू केले.

भ्रमणध्वनी या उपकरणाचा वापर एकमेकांशी संवाद साधण्यासाठी आणि संदेश पाठवण्यासाठी केला जातो. सुरुवातीस याचा आकार लहान होता, पण जशी विज्ञानात प्रगती होत गेली, तशी याच्या आकारात वाढ होत गेली आणि त्याच्या कर्तृत्वाच्या कक्षा मात्र कायम रुंदावतच गेल्या. आज संवाद आणि संदेश याव्यतिरिक्त भ्रमणध्वनीचे अनेक फायदे व वैशिष्ट्ये आहेत. आज यावर गाणी ऐकता येतात, चित्रपट पाहता येतात, ऑनलाईन खेळ खेळता येतात, इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील पुस्तके वाचता येतात, इच्छित विषयाबाबत माहिती मिळवता येते, बँकेचे व्यवहार करता येतात हे आणि असे अनेक उपयोग आहेत, जे आपण सर्वच जाणतो ! म्हणूनच तर हा भ्रमणध्वनी आज मनुष्याच्या मनावर तर आहेच, पण त्याच्या जीवनपद्धतीवरही अधिराज्य गाजवत आहे.

भ्रमणध्वनीची निर्मिती आणि त्यात दिवसागणिक होत जाणारी प्रगती हे विज्ञान संशोधनाचे यश आहे आणि विज्ञानक्षेत्रातील प्रगतीचे एक उत्तम उदाहरण ! या ज्ञानयुगातील हा अत्यंत महत्त्वाचा घटक झालेला आहे. पण आपण नेहमीच म्हणतो 'प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात'. याआधी मी जसं त्याच्या फायद्यांचा उल्लेख केला, तसंच आणखी काही गोष्टींबद्दल मला लिहावेसे वाटते. आजकाल आपण करत असलेला त्याचा अतिवापरही डावलता येणार नाही !

एकमेकांशी संवाद साधता यावा, या उद्देशाने या उपकरणाचा शोध लावण्यात आला. आज विज्ञानातील उच्च प्रगतीमुळे आंतरजालाचा (इंटरनेटचा) चमत्कार घडून आला आणि आज जगातील परिस्थिती काही वेगळीच दिसून येते. या 'इंटरनेट' नावाच्या चमत्काराने मनुष्य त्या भ्रमणध्वनीमध्ये इतका हरवून जातोय की, एकमेकांशी प्रत्यक्ष संवाद साधणेही दुर्मीळच होत चालले आहे. मी अगोदर उल्लेख केलेले भ्रमणध्वनीचे उपयोग हे या इंटरनेटमुळेच शक्य व सुलभ झाले आहेत. ज्ञानाचा महामार्ग खुला झाला आहे. याच्या जोरावर आज अनेक गोष्टींत यश मिळवणे शक्य झाले आहे. कारण आपल्याला आवश्यक असणारी सर्व माहिती सहजरित्या उपलब्ध होते. त्या विषयावरील पुस्तके मोफत वाचता येतात. भ्रमणध्वनीवर उपलब्ध असलेले निरनिराळे ॲप्लिकेशन्सही उपयुक्त ठरतात. पण शंभर मधील दहा टक्के तरुणपिढीच याचा वापर करत असावी, असे वाटते.

आजकाल जिथे पाहू तेथे सर्वजण हातात मोबाईल घेऊनच उभे असतात. पूर्वी लोकलमधून प्रवास करणाऱ्या व्यक्ती वर्तमानपत्रं, पुस्तकं सोबत ठेवून लोकलमधील मोकळ्या वेळात ती वाचायच्या, परंतु आज मात्र सर्रास

संपत्ती आणि शहाणपण क्वचितच एकत्र नांदताना दिसतात! - लिव्ही

सगळे फक्त आणि फक्त मोबाईलमध्ये घुसलेले असतात. केवढा तो अतिरेक ! मी स्वतः मात्र मोबाईलचा वापर वाचनासाठी आणि योग्य त्या ठिकाणी पुरेसा असाच करते. त्यामुळे मी वाचलेल्या एका संकेतस्थळावरील 'मोबाईलच्या अतिरेकाचे परिणाम' याबद्दल सांगते.

• भ्रमणध्वनीद्वारे जे Electro Magnetic Radiation निघतात त्याचा शरीरावर फार मोठा दुष्परिणाम होतो. विशेषतः लहान मुलांसाठी फारच हानिकारक.

• मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे सुसंवाद फारच कमी झालेला आहे. कारण गप्पागोष्टींपेक्षा सगळेजण मोबाइलवरच व्यस्त असतात.

• मोबाईलमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. मैदानी खेळ खेळण्याच्या वयात लहानगे मात्र ऑनलाईन खेळ खेळू लागले आहेत.



एकाग्रतेचा अभावही जाणवतो.

• मोबाईलमधील रेडिआ फ्रिक्वेन्सीस (Radio Frequencies) चा बेस स्टेशनशी संवाद साधण्यासाठी वापर केला जातो. त्यामुळे (RF) शरीराच्या तापमानात अतिरिक्त वाढ होते. त्याचा परिणाम मेंदू व शरीरावर होतो.

• याशिवाय काही भयंकर खेळांचे मोबाईल ॲप्लिकेशन्स तयार केले जातात. 'Blue Whale Challenge' आणि 'Momo Challenge' ही दोन भयंकर उदाहरणे असे खेळ मुलांना आत्महत्येस प्रवृत्त करतात व मुलं या खेळांच्या आहारी जाऊन अघटित घटना घडतात. याचे अनुभव आपण गेल्या वर्षभरात पाहिलेच.

अशा प्रकारे मोबाईलच्या गरजेचं रुपांतर व्यसनात कधी झालं हे आपल्याला समजलंच नाही.

आज जगाला विसर पडत चालला आहे की, 'मोबाईल आपल्यासाठी निर्माण करण्यात आला होता, आपण मोबाईलसाठी नव्हे.' मी सुद्धा तरुणपिढीतील असल्याने, मी हे सगळे आज अनुभवतेय, स्वतःच्या डोळ्यांनी 'चॅट' करण्याच्या नादात 'प्रत्यक्ष संवाद' मात्र राहून जातो. 'फोटो' 'अपलोड' करण्याच्या नादात ते 'मनामध्ये साठवून' ठेवणे राहून जाते, सगळ्या प्रकारच्या 'feelings' पोस्ट करण्यात 'खऱ्या भावना' मात्र हरवत आहेत, e-book वाचताना स्वतःच्या हातात पुस्तक घेऊन वाचण्याची मजा हरवत आहे. 'shortform' करण्याच्या नादात 'शब्दच' हरवत आहेत, 'emaji' च्या नादात 'खऱ्या प्रतिक्रिया'च विसरल्या जात आहेत. 'status update' करण्याच्या मग्नतेत 'स्वतःचा दर्जा उंचावणे' मात्र राहून जातेय, 'Selfie' मधे स्वतःला बघण्याच्या नादात आज आरशासमोर उभे राहून स्वतःचे परीक्षण करणे राहून जातेय आणि शेवटचं पण अत्यंत महत्त्वाचं म्हणजे 'सोशल मिडियावरील' 'friend list' जपताना 'खरे मित्र आणि नाती' जपण्याकडे दुर्लक्ष होत आहे, ही आहे सद्यपरिस्थिती.

असे या भ्रमणध्वनीचे अधिराज्य सर्वत्र आहे. म्हणून आपण याचे गुलाम होता कामा नये. माझे काही असे म्हणणे नाही की, याचा वापरच करू नये किंवा त्यांच्या वैशिष्ट्यांचा आनंद घेऊ नये. पण त्याला मर्यादा या असल्याच पाहिजेत. असे केल्यास प्रत्येकाची प्रगती होईल आणि आपल्यालाच या जगातील अटीतटीच्या स्पर्धेत पुढे जाता येईल. अन्यथा सगळेच कठीण !

**– गौरी अंबाजी परब**
(द्वितीय वर्ष – बी.एम.एम.)
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••


नशीब फिरले तर संपत्ती जाईल; पण ते धैर्य मात्र हिरावून घेऊ शकणार नाही! – सिनेका

# कोल्हा, शेअरबाजार आणि ....

*अगदी नुकतीच प्रकाशित झालेल्या सुप्रसिद्ध लेखक फ्रेडरिक फोरसिथ यांची 'दि फॉक्स' या नव्याकोऱ्या कादंबरीचे चंद्रशेखर टिळक यांनी लिहिलेलं परीक्षण - संपादक*

'कोल्हा, शेअरबाजार आणि ....' हे शीर्षक वाचून गोंधळलात का? नाही. माझी त्यात काही चूक झाली आहे असे मला नाही वाटत. हा लेख वाचून पूर्ण झाल्यावरही मात्र जर तुम्हांला हे शीर्षक देण्यात काही चूक झाली आहे असं वाटलं तर जरूर कळवा. मी शीर्षक बदलेन. तोपर्यत (आणि नंतरही) मला कोल्हा म्हणायचं की नाही हे मी तुमच्यावर सोडतो. बाकी काही नाही .

अगदी नुकतीच सुप्रसिद्ध लेखक फ्रेडरिक फोरसिथ यांची 'दि फॉक्स' ही नवीकोरी कादंबरी वाचून पूर्ण झाली. ती कादंबरी आहे पूर्णपणे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयावर. अगदी नेमकं सांगायचं तर दोन बलाढ्य राष्ट्रांच्या सक्षम गुप्तहेर संघटनांच्या तीव्रतम स्पर्धेवर. म्हणजेच सकृतदर्शनी तरी या कादंबरीच्या विषयाचा शेअर बाजाराशी संबंध नाही. पण तरीही ह्या कादंबरीमधले काही प्रसंग, काही वाक्ये वाचताना मला सारखे वाटते होते की, हे सारे शेअरबाजारालाही लागू पडतं की! असा असलेला किंवा नसलेला संबंध मांडण्याचा शब्दप्रपंच म्हणजे हा लेख.




सध्या सायबर - स्पेस आणि सायबर - क्राईम या विषयांची चर्चा जगातल्या इतर देशांप्रमाणे आपल्याही देशात सुरू आहे. फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या या कादंबरीची सुरवातच मुळी hacking ने करतात. केवळ कुतूहलापोटी सुरू झालेल्या या प्रवासाची सांगता राजाश्रयातून कशी वेगवेगळ्या टप्प्याने होते हाच तर मुळी या कादंबरीचा कथाविषय आहे. असाच एक प्रसंग या कादंबरीत रंगवताना फ्रेडरिक फोरसिथ लिहून जातात ...If not more , atleast matching pace ....खरं म्हणजे, पुढच्यापेक्षा सेकंदभर तरी जास्त वेगाने; पण निदान जे मोजके इतरांपेक्षा थोड्या तरी जास्त वेगाने जातात त्यात तरी मी....हें सगळे कादंबरीत पूर्णपणे वेगळ्या संदर्भात येते....पण पूर्वीच्या काळी गाजायचे ते इनसायडर ट्रेडिंग यापेक्षा काय वेगळे असायचे ...सध्याच्या मार्जिन ट्रेडिंगच्या आणि derivatives ट्रेडिंगच्या प्राबल्याच्या जमान्यात याचे महत्त्व उरतेच ना! नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे बहुचर्चित को - लोकेशन प्रकरण याहून फारसे वेगळे असेल का? एकंदरीत काय, तंत्रज्ञान कोणत्याही क्षेत्रात जाताना

त्याचे गुणधर्म घेऊन जाते.... सकारात्मकही आणि नकारात्मकही ! याबाबत संबंधित नियंत्रक सातत्याने लक्ष ठेवून असले तरीही, तुमच्या-माझ्या सारख्या सर्वसामान्य गुंतवणूकदाराने बाजारात येताना प्रत्यक्ष बाजाराइतकीच .....

पण म्हणून याचा बाऊ करत शेअरबाजारात यायचेच नाही असंही करून चालत नाही, चालणार नाही. याच कादंबरीत फ्रेडरिक फोरसिथ म्हणतात तसं ... Like so much in life , we will never know if we do not try .

असं म्हणणं केवळ सबब किंवा pep talk नाही. कारण असे दोष तंत्रज्ञानच शोधून काढत असते. त्याला hacking म्हणता येत नाही. कदाचित tracking म्हणता येईल. अशा प्रयत्नांतून उघडकीस आलेली माहिती कोणीही, कितीही प्रयत्न केले तरी उघडकीस येतेच. इतकेच नव्हे; तर असं उघडकीस यायला आता पहिल्याइतका वेळही लागत नाही. संबंधित संस्था अगदी कितीही प्रबळ असली तरी.... या कादंबरीत फ्रेडरिक फोरसिथ सहजच लिहून जातात..... Even in - controlled dictatorship , the power of the Internet can not be repressed for very long. हे विधान कादंबरीत साहजिकच पूर्णपणे वेगळ्या संदर्भात येत असले तरी ते एकदम मनात ठसतेच... आणि एकदा मनात ठसले की त्याचा कॅलिडोस्कोप सुरू होतो ... आणि कॅलिडोस्कोपला क्षेत्राचे बंधन उरत नाही ना ....

हे सगळे मनात येत असताना एक सारखे जाणवत राहाते आणि त्याला गेल्या तीस वर्षांच्या अनुभवाची पार्श्वभूमी असते ...जाणवतं असे की, कोणत्याही क्षेत्रात पुढच्याला हरवण्यापेक्षा स्वतः जिंकणे हे जास्त महत्त्वाचे आणि उपयोगी असते. हे जरा जास्त कठीण आहे. असे यश फारसे टिकाऊ नसले तरी हीच पद्धत जास्त विश्वासार्ह असते. यात सतत प्रयत्न करावे लागतात. करत राहावे लागतात. कारण हे क्षेत्र स्वतःच सतत बदलत राहाते ....गुंतवणूक क्षेत्र तर नक्कीच ....राजकारण हे क्षेत्र तरी कुठे वेगळे ....फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या The Fox या नव्या कादंबरीतल्या एका प्रसंगात सहज लिहून जातात .... Outwitting , rather than outshooting is the ideal . ... ( गोवा विधानसभा आठवायला लागते ना ....)

हे सगळे जमवायचे म्हणजे बावळट राहून काही चालणारे नाही. गरीब असणं हा एरवी गुणविशेष म्हणून गौरवला जात असला तरी गुंतवणूक आणि राजकारण या दोन क्षेत्रांत ते दोष वैशिष्ट्यच ठरते. मुळातच गरीब असणं म्हणजे बावळट असणं नाही. असूच शकत नाही. असणं परवडतच नाही. या क्षेत्रात, या जमान्यात तर नाहीच नाही. इथे सदैव जागरूक, धूर्त असावंच लागते. त्यामुळे कादंबरी पहिल्यांदा हातात घेतली तेव्हाच The Fox हे त्याचे शीर्षक गुप्तहेरी, संबंधित राजकारण यांच्या इतकंच गुंतवणूक क्षेत्रालाही कुठेतरी लागू पडते असे मनाने घेतले होते. ही कादंबरी वाचून पूर्ण झाल्यावर ते मत आणखीनच दृढ, पक्के झाले. कोल्हा झाला म्हणून त्याची कधी, कुठे फसगत होत नाही असे नाही हेही मनात पहिल्यापासूनच होते. त्यामुळे जेंव्हा फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या The Fox या कादंबरीत जेंव्हा म्हणतात की, Even Foxes make mistakes तेंव्हा फार बरे वाटते.

हे वाचत असताना एक प्रश्न पडला की, कोल्हा देखील गोंधळात जास्त केंव्हा पडत असेल ....त्याचे ही ऊत्तर फ्रेडरिक फोरसिथ त्यांच्या The Fox या कादंबरीत देऊन जातात .... Beware the Bear सध्या मंदीच्या बाजाराचे पडघम जोरात आहेत. त्यातही तीव्र तेजी आणि पाठोपाठ अचानक मंदी ही वेड्यावाकड्या प्रकारांची नांदी असते असा अनुभव आहे. यातल्या दोन्ही किंवा निदान एका टप्प्याने कोल्ह्यानाही चकवलेले असू शकते.

बैल आणि अस्वल (बुल्स आणि बेअरस) हे दोन प्राणी शेअरबाजाराशी निगडित असण्याची आपल्याला सवय असते. बाजाराच्या या दोन्ही स्थितीत आपल्या अक्कलहुशारीने आपले नाणे वाजवून दाखवणाऱ्या मंडळींना त्यांच्या धूर्तपणे खेळलेल्या डावांसाठी सन्मानित करताना कोल्हा ...The Fox ......आपल्या सेन्सेक्सच्या अलीकडच्या उलटसुलट प्रवासानंतरही आपल्या देशातील एका यशस्वी गुंतवणूकदारांनी ५ कंपन्यांच्या भांडवलात आपला हिस्सा वाढवल्याची बातमी याच आठवड्यात तर प्रसिद्ध झाली आहे. या ५ कंपन्यांचे शेअर्सचे बाजारभाव ३०- ३५ टक्क्यांनी कमी झालेले असूनही .....

अशावेळी धूर्त शब्दांचा नकारात्मक अर्थ कमी होत त्याला मुत्सद्दीपणा या शब्दाची छटा जास्त चढू लागते का?

एक जरा वेगळे ...शेवटी ...हे सगळे पचायला , रुचायला आपल्या मराठीत 'कोल्हा' या शब्दाला जो एक अतिरिक्त नकारात्मक वास आहे ना ...तो तेवढा विसरता आला पाहिजे ...

The Fox ...कोल्हा ...राजकारण ...समाजकारण ...अर्थकारण गुंतवणूक ...शेअरबाजार ....कोल्हा .....आणि ....

**- चंद्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

(पृष्ठ क्र. ७ वरून – **दक्षिण आफ्रिकेतील माझे काही शैक्षणिक अनुभव**)

**संशोधनास प्राधान्य**

माझ्या एक वर्षाच्या कालावधीत मला उल्लेखनीय जी बाब जाणवली ती म्हणजे दक्षिण आफ्रिकेत विद्यापीठ स्तरावर संशोधनास देण्यात येणारे प्राधान्य. संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यासाठी आधुनिक सुविधा आणि आर्थिक पाठबळ पुरविणे ह्या बाबींसोबत विविध तज्ज्ञांसोबत सतत भेटी घालून देणे येथे बघायला मिळाले. संशोधन प्रक्रियेत केलेले संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी विविध स्तरावर सतत संशोधकांना मदत आणि संधी मिळते. संशोधनाचे लिखाण कसे करावे? संशोधन लेख प्रसिद्ध करताना काय करावे लागते? आणि संशोधन मासिके आपल्या संशोधनासाठी कशी निवडावी यासाठी विविध कार्यशाळा, परिसंवाद नियमितपणे होत असतात. विद्यापीठीय स्तरावर विविध विभागात यासाठी वेगळे प्रशासकीय विभाग आहेत जे अशा कार्यशाळेचे आणि परिसंवादाचे आयोजन करतात. National Research Foundation आणि शिक्षण मंत्रालय भरपूर आर्थिक पाठबळ पुरविते. आपल्या देशात सुद्धा संशोधनाची गुणवत्ता वाढवायची असेल तर संशोधकांना मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ पुरविणे गरजेचे आहे.



**- डॉ. नरेंद्र दा. देशमुख**
संशोधन अधिकारी,
होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र,
मानखुर्द, मुंबई - ४०० ०८८

•••

नुसते चांगले कृत्य करून उपयोग नाही, ते योग्य रीतीनेदेखील केले पाहिजे. - जॉन मोर्ले

# श्रीलंकेतील घटनात्मक पेचप्रसंग

*श्रीलंकेतील मागच्या आठवड्यात नाट्यमयरित्या राजकीय विश्वात घटनात्मक पेचप्रसंग घडले. यावर प्रकाश टाकणारा जेष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख – संपादक*

श्रीलंकेमध्ये सध्या अंतर्गत राजकारणात नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत. श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष सिरीसेना यांनी पंतप्रधान रणील विक्रमसिंघे यांची हकालपट्टी करत महिंदा राजपक्षे यांच्या हाती पंतप्रधानपदाची सूत्रे दिली आहेत. विक्रमसिंघे हे संसदेचे सदस्य आहेत, त्यांना बहुमताचा पाठिंबाही आहे. असे असतानाही त्यांना बाजूला काढून टाकत राजपक्षे यांना पंतप्रधानपदी बसवण्यात आले आहे. वास्तविक, १९ व्या घटनादुरुस्तीनंतर राष्ट्राध्यक्षांना असा हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे यामध्ये कदाचित घटनात्मक हस्तक्षेप करण्यात येण्याच्या दाट शक्यता आहेत. तथापि, राजपक्षे यांचे शासन श्रीलंकेत येणे हे भारतासाठी चिंता वाढवणारे आहे.

हा श्रीलंकेतील अंतर्गत बदल असला; आणि तो कायदेशीर आहे की नाही यावर चर्चा होणार हे खरे असले; तरीही ही घटना एकूणच दक्षिण आशियाच्या आणि विशेषतः भारत–श्रीलंका यांच्या संबंधांवर परिणाम करणारी आहे. हे परिणाम समजून घेणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम श्रीलंकेमध्ये ही घडामोड का घडली हे जाणून घेऊ या. श्रीलंकेत जेव्हा २०१५ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यापूर्वी तेथे १० वर्षे राजपक्षे यांचे सरकार होते. त्यांच्या कारकीर्दीत अत्यंत महत्त्वपूर्ण बदल घडले होते. २००९ मध्ये एलटीटीई पराभव होऊन यादवी युद्ध संपले आणि त्यामध्ये श्रीलंकेचा विजय झाला. हा प्रामुख्याने राजपक्षे यांच्या नेतृत्वाखाली झाला होता. तथापि, त्यावेळी राजेपक्षे यांच्यावर मानवाधिकार उल्लंघनाचे गंभीर आरोप ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार संघटनेतही त्यांच्या विरोधात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. राजपक्षे यांच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कार्यकाळात श्रीलंका हा कमालीचा चीनकडे ओढला गेला होता. एक प्रकारे श्रीलंका चीनला गहाण टाकला असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यांच्याविरोधात श्रीलंकेतील लहान–मोठे पक्ष एकत्र आले, त्यांनी राजपक्षे यांचा पराभव केला आणि तिथे युती शासन सत्तेत आले होते. २०१५च्या निवडणुकांदरम्यान राजपक्षे यांच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या अनेक नेत्यांनी त्यांच्या पक्षाचा त्याग करून राजपक्षे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे मैथ्रीपाल सिरीसेना हे स्वतःही राजपक्षे यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री होते. परंतु ते पक्षातून फुटले आणि त्यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. त्याचबरोबर ते राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूकही लढवून जिंकून आले. विशेष म्हणजे ही निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा राजेपक्षे यांच्या फ्रीडम पार्टीमध्ये प्रवेश केला. रणील विक्रमसिंघे यांचे भारताबरोबरचे संबंध चांगले होते; पण राजपक्षे यांच्या काळात भारताबरोबरचे संबंध तणावपूर्ण होते. त्यामुळे भारतासाठी श्रीलंकेत राजपक्षेंचे शासन असणे प्रतिकूलच ठरणारे होते. पण आता नेमके तेच पंतप्रधान बनले आहेत. परिणामी, भारताच्या चिंता वाढल्या आहेत.

अर्थात, येणाऱ्या काळात श्रीलंकेची जनता पंतप्रधानांना दूर करण्यात यशस्वी होईल का हे पहावे लागेल. हा एक अत्यंत महत्त्वाचा घटनात्मक पेचप्रसंग

श्रीलंकेत निर्माण झालेला आहे. यासंदर्भात आपल्याला श्रीलंकेमध्ये २०१५ मध्ये झालेल्या १९ व्या घटनादुरुस्तीकडे पहावे लागेल. ही घटना दुरुस्ती प्रामुख्याने श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकार कमी करणारी आहे. त्यापूर्वी १८ वी घटनादुरुस्ती राजपक्षे यांच्याकाळात झाली होती आणि त्यातून राष्ट्राध्यक्षांचे अधिकार मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आले होते. त्यानुसार राष्ट्राध्यक्ष सर्वच निर्णय घेऊ शकत होते. यातून जणू तेथे अध्यक्षीय प्रणाली असावी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे सिरीसेना यांनी प्रचारादरम्यान १८ व्या घटनादुरुस्तीत सुधारणा करू असे आश्वासन दिले होते. त्याचे पालन करत सत्तेवर आल्यानंतर त्यांनी १९ वी घटनादुरुस्ती केली आणि त्यात राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारावर निर्बंध आणले गेले. त्यानुसार, संसदेचे सदस्यत्व असेपर्यंतच कोणाही नेत्याला पंतप्रधानपदावर राहता येईल; संसद सदस्यत्व रद्द झाले तरच पंतप्रधानपद रद्द होऊ शकते अशी एक महत्त्वाची तरतूद करण्यात आली.

आजघडीला रणील विक्रमसिंघे हे संसदेचे सदस्य आहेत, त्यांना बहुमताचा पाठिंबाही आहे. असे असतानाही त्यांना बाजूला काढून टाकत राजपक्षे यांना पंतप्रधानपदी बसवण्यात आले आहे. वास्तविक, राष्ट्राध्यक्षांना असा हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे यामध्ये कदाचित घटनात्मक हस्तक्षेप करण्यात येण्याच्या दाट शक्यता आहेत. काही न्यायालयीन प्रकरणे येणाऱ्या काळात तेथे उद्भवतील. श्रीलंकन संसदेचे अधिवेशन बोलावून राजपक्षे आणि रणील विक्रमसिंघे या दोघांनाही आपले बहुमत सिद्ध करावे लागेल आणि त्यातून कोण पंतप्रधान हा निर्णय घेतला जाईल.

आता मुद्दा उरतो तो पंतप्रधानपद बदलण्याचा निर्णय तडकाफडकी का घेण्यात आला हा. याचे कारण त्यांच्यातील अंतर्गत कलह मोठ्या प्रमाणावर वाढत चालला होता. पदच्युत करण्याच्या दोन आठवडे आधी विक्रमसिंघे हे भारताच्या दौऱ्यावर आले होते. त्यात भारताने विक्रमसिंघे यांना सक्त ताकीद दिल्याच्या काही बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. भारत श्रीलंकेत ज्या साधनसंपत्तीचा विकास करू इच्छित आहे त्याला पूर्णपणे वाव दिला जात नाहीये, यासंदर्भातही चर्चा झाली होती. पूर्वी राजेपक्षे यांच्या कारकीर्दीत श्रीलंकेने मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतले होते, हे कर्ज परत फेडण्याची आर्थिक क्षमता श्रीलंकेत राहिली नव्हती. त्यामुळे याबाबत एक सौदेबाजी झाली आणि हंबनतोता नावाचे बंदर श्रीलंकेने ९९ वर्षांच्या लीजने चीनला दिले. त्याच्या विकासाचा संपूर्ण हक्क चीनने आपल्याकडे घेतला. आता चीन वन बेल्ट वन रोडमधील महत्त्वाचा देश म्हणून श्रीलंकेकडे पहात आहे. त्या दृष्टीने चीन तिथे विकासकामेही करत आहे. या हंबनतोता बंदराजवळ भारताला एक विमानतळ बांधायचा होता. त्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नव्हत्या. विक्रमसिंघे यांच्या दौऱ्यादरम्यान भारताने याबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त केली होती. हे नाराजीचे शब्द घेऊनच विक्रमसिंघे परत गेले होते. भारताबरोबरच्या संबंधांवरून सिरीसेना आणि विक्रमसिंघे यांच्यात वाद निर्माण झालेला होता. त्यानंतर काही दिवसांतच विक्रमसिंघे यांना बाजूला करण्यात आले. थोडक्यात, भारतभेटीनंतर लगेचच घडलेली ही घटना आहे. त्यामुळे या घडामोडींमागे अंतर्गत कलहाचे कारण आहेच; पण त्याखेरीज परराष्ट्र संबधांशी निगडित दूरगामी परिणामही याच्या मुळाशी आहेत. भारत श्रीलंका संबंधांशी हा प्रकार जोडला गेला आहे.

गेल्या वेळी श्रीलंकेत जेव्हा सार्वत्रित निवडणुका झाल्या होत्या तेव्हा चीनने राजपक्षे यांच्या बाजूने भरपूर पैसा लावला होता. त्यांची निवडणूक मोहीम ही चीनकडून पुरस्कृत होती अशा प्रकारच्या बातम्या आल्या होत्या.

(पृष्ठ क्र. ३१ वर)

# आमची चारधाम यात्रा - एक अद्भुत अनुभव

*'चारधाम' यात्रेचे अविस्मरणीय अनुभव या लेखात विशद केले आहेत.- संपादक*

आमच्या भ्रमणमंडळाची चौधरी यात्रा कंपनी तर्फे २६ मे ते ९ जून २०१८ दरम्यानं 'चारधाम' यात्रा झाली. यापूर्वीही आमच्या मंडळाने बऱ्याच धार्मिक, ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या आहेत. त्यात महत्त्वाचे म्हणजे भारतातील 'बारा ज्योतिर्लिंग' ला भेट देण्याची सर्वांचीच इच्छा होती. त्यापैकी ह्यापूर्वी आम्ही अकरा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेऊन आलो होतो. सगळ्यात शेवटचे म्हणजे बारावे ज्योतिर्लिंग 'केदारनाथ' हे अवघड होते. ते बरेच खर्चिकही होते. पण सर्वच सदस्यांची तेथे जाण्याची आंतरिक ओढ होती. तो विचार साधारणपणे २०१५ पासून सुरू होता. त्यासाठी प्रत्येकाने रुपये १०००/- चे रिकरिंग डिपॉझीट काढले. त्यामुळे मे २०१८ पर्यंत प्रत्येकाजवळ साधारण २४०००/- इतकी रक्कम जमली. पण ही यात्रा कशी करायची हा विचार पक्का होत नव्हता. त्या संदर्भात आमचे एक सदस्य श्री. बोरुडे यांनी डोंबिवलीतील चौधरी यात्रा कंपनीत जाऊन सर्व चौकशी केली. चौदा दिवसांची यात्रा ही जवळ जमा असलेल्या रकमेत होऊ शकते ह्याची खात्री झाली. ती सर्व सदस्यांना सांगितली. ती त्यांना मान्यही झाली. ह्याशिवाय इतर खर्चाकरिता २०००/- ते ३०००/- रुपये लागणार होते. त्यालाही सगळ्यांची मानसिक तयारी होती. कारण एकच की, आपल्याला बारा ज्योतिर्लिंगांच्या दर्शनाचे पुण्य मिळावे. त्यानंतर मार्च २०१८ ला ॲडव्हान्स भरून आमची यात्रा निश्चित केली. चौदा दिवसांची कार्यालयीन सुट्टी जवळ-जवळ पाच कर्मचाऱ्यांना दिल्याबद्दल संस्थेचे प्राचार्य दिलिपकुमार नायक यांचे खरोखरच आभार. आता मात्र प्रत्येक सदस्य यात्रा प्रस्थानाच्या २६ मे २०१८ च्या तारखेकडे आतुरतेने वाट बघत होता.

२६ मे उजाडला आणि आमची यात्रा सुरू झाली. त्याचा सविस्तर वृत्तांत देत आहे. ह्याचा मुख्य उद्देश असा आहे की, जर का कोणाला चारधाम यात्रा करण्याचा शुभयोग आलाच तर त्याला ह्या माहितीचा उपयोग व्हावा. शिवाय आम्हाला जो आनंद उपभोगता आला त्याची थोडी कल्पना सगळ्यांना यावी. अर्थात ह्या चार पानांवरून फक्त कल्पनाच येऊ शकते. प्रत्यक्ष तेथे गेल्याशिवाय तो आनंद भोगता येतच नाही. म्हणतातच ना की, 'आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही', त्यातलाच हा प्रकार. मी कधी परदेशात गेलो नाही. दुबई, मलेशिया हे बरेच देश मानव निर्मित आहेत. पण उत्तराखंड हा प्रदेश निसर्ग निर्मित आहे. हे तेथे गेल्यावर प्रचीती येते. असो, आता आमच्या यात्रेचे सविस्तर वर्णन बघू.

आम्ही सर्व सदस्य २६ मे २०१८ ला सकाळी ९.०० वाजता कल्याणहून पुष्पक एक्सप्रेसने मनमाडला पोहोचलो. तेथून दुपारी अडीच वाजता कर्नाटक एक्सप्रेसने दिल्लीला रवाना झालो. दि. २७ मे ला सकाळी अकरा वाजता दिल्लीला पोहोचलो. तेथून दुपारी तीन वाजता जनशताब्दी एक्सप्रेसने सायंकाळी सात वाजता हरिद्वारला पोहोचलो. स्टेशनवर चौधरी यात्रा कंपनीचा गाईड आम्हा मंडळींना नियोजित मुक्कामावर घेऊन गेला. तेथे रात्रीचे जेवण करून झोप काढली. दुसऱ्या दिवसापासून म्हणजे २८ मे पासून आमची 'चारधाम' यात्रा सुरू होणार होती.

माणसे जी दुष्कृत्ये करतात, ती त्यांच्या मृत्यूनंतरही टिकतात. चांगले केलेले मात्र त्यांच्या मृत्यूबरोबरच नष्ट होते! - शेक्सपीअर



चारधाम यात्रेचे मुख्य प्रवेशद्वार म्हणजे 'हरिद्वार' हे भारतातील सात धार्मिक स्थानांपैकी एक आहे. शब्दशः अर्थ घेतल्यास परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग आहे. ह्या ठिकाणी गंगा नदी पहाडातून उतरत मैदानात म्हणजे समतल भागात प्रवेश करते. प्रतिवर्षी लाखो भाविक ह्या गंगा नदीच्या निर्मळ प्रवाहात स्नान करतात. ह्या ठिकाणी कुंभमेळा आयोजित केला जाते. ह्या शहराची स्थापना १७०० वर्षांपूर्वी झाली असून हे शहर फार जुने आहे. ह्या शहरात प्रसिद्ध 'चंडादेवी' मनसादेवी, शांतीकुंज, भारतमाता मंदिर, काचमंदिर व इतर खूप सारी मंदिरे आहेत. 'चारधाम' ह्या देवभूमीत प्रवेश करायचे मुख्य द्वार म्हणजे हरिद्वार अशी श्रद्धाळू जनांची खात्री आहे.

दि. २८ मे ला सकाळी ७.३० वाजता गंगा स्नानाला गेलो. श्री गंगामाईच्या स्वच्छ निर्मळ आणि थंडगार पाण्यात मनसोक्त स्नान करून १०.०० वाजता निवासस्थानी परतलो. दुपारी शांतीकुंज ह्या गायत्री मातेच्या मंदिराला भेट दिली. तेथील वेगवेगळी फुलझाडे व गायत्रीदेवीचे मंदिर फारच सुंदर आहे. त्यानंतर भारतमाता मंदिरात गेलो. ह्या सातमजली इमारतीमधील दृष्ये फारच विलोभनीय होती. पुढे चारधाम मंदिरे, काच गणेश मंदिर, राम दरबार मंदिर वगैरे बघून सायंकाळी ६.०० वाजता निवासस्थानावर परतलो. रात्री ७.०० वाजता गंगा मातेची आरती घाटावर जाऊन बघितली. फारच मनोरम्य आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे दृष्य होते.

दि. २९ मे ला सकाळी चहा-नाश्ता करून 'चारधाम' यात्रेसाठी सर्वात प्रथम असणाऱ्या यमनोत्रीसाठी रवाना झालो. यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचे पॅनकार्ड, आधारकार्ड व मोबाईलची नोंदणी करूनच प्रत्येकाला 'केदारनाथ' व 'बद्रीनाथ'चा पास दिला जातो. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी व प्रवासातील महत्त्वाच्या सूचनेसाठी ह्याची आवश्यकता असते. हे सर्व सोपस्कार करून रात्री ९.०० वाजता बारकोटला पोहोचलो. रात्रीचा मुक्काम बारकोटलाच होता.



**यमुनोत्री उगमस्थान**

दि. ३० मे ला सकाळी ४.३० वाजता बारकोटहून यमनोत्रीकडे आम्ही मंडळी रवाना झालो. साधारणपणे तीन तास प्रवास करून यमनोत्रीच्या पायथ्या स्थळी पोहोचलो. तेथून यमुनोत्री मंदिर ६ कि.मी.वर आहे. हे अंतर घोड्याने जावे लागते. अथवा पायीसुद्धा जाता येते. आमच्यापैकी बरेच जण पायी चालून गेले व दोघातिघांनी घोड्याने जाण्याचे ठरविले. घोड्याचा ६ किलोमीटरचा प्रवास खडतरच म्हणावा लागेल. मंदिराकडे जाणारे घोडे, मंदिराकडून परत येणारे घोडे, पायी चालणारे

माणसाला प्रामाणिकपणे घाम गाळून स्वतःचे पोट भरता यावे म्हणून त्याला संरक्षण देणाऱ्या यंत्रणेला 'सरकार' म्हणतात. - एच.एस. जॉन्सन

पर्यटक, वृद्ध लोकांना वर-खाली आणणाऱ्या पालख्या आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी व त्यातून खळखळ वाहणारी ती स्वच्छ यमुना नदी. परमेश्वर कृपेने आम्ही मंडळी सुखरूप मंदिरापर्यंत पोहचलो. तेथे पोहचल्यावर यमुनोत्री नदीच्या थंडगार पाण्यात आंघोळी केल्या. बर्फाचे पाणी काय असते ह्याची कल्पना उत्साही सदस्य श्री. शिंगाडे व श्री. धुमाळ आणि श्री. केरकर यांना आली. बाकीच्या सदस्यांनी तेथेच असलेल्या गरम कुंडात आंघोळ्या केल्या. सगळा श्रमपरिहार नाहीसा झाला. नंतर यमनोत्री देवीचे दर्शन घेतले. दुपारी अडीच वाजता परत खाली उतरलो. तेथून निघून रात्री आठ वाजता बारकोटला परतलो. दुपारच्या परिक्रमाने रात्री झोप खूप छान लागली. 'चारधाम' प्रथम स्थान यमनोत्री बघितल्याचा आनंद झाला. यात्रा सुखरूप झाली.

भारतातील यात्रेत 'चारधाम' ही यात्रा फार महत्त्वाची समजतात. यमुना नदीच्या प्रवाहात बसलेले यमनोत्री मंदिर हे चारधाम मंदिरांपैकी पहिले ठिकाण. चारधाम यात्रा ही या ठिकाणाहूनच सुरू होते. हे मंदिर तिबेटीयन पद्धतीने बांधले असून लाल रंगाचे वाळूचे दगड व हिरव्या रंगाच्या दगडांच्या कलाकुसरीने सजविले आहे. ह्या मंदिराच्या बाबतीत बऱ्याच कथा आहेत. हे हिंदू मंदिर गडवालच्या पूर्व दिशेला आहे. कालिंद पर्वतावर ३२९१ मीटर उंचीवर आहे. हनुमान चट्टीपासून १३ किमीवर व जीनकी चट्टीपासून ६ किमी अंतरावर आहे. ह्या ठिकाणाहून मंदिरापर्यंत पायी अथवा घोड्याने जाता येते. अती विकलांग अथवा वृद्ध व्यक्तींसाठी डोलीची व्यवस्था आहे. जानकी चट्टी ते यमनोत्री ह्या प्रवासात निसर्गाचे अतिरम्य असे दर्शन होते. आकाशापर्यंत जाणारी अति उंच पर्वत शिखरे, त्यामधून खाली कोसळणारे धबधबे आणि खळखळत खोल दरीतून वाहणारी यमुना नदी हे दृष्य रमणीय तर आहेच पण थोडे भयदायकही आहे. बर्फाच्छादित पहाडीने घेरलेल्या ह्या ठिकाणी 'सूर्यकुंड' ह्या गरम पाण्याचे जलाशय आहे. पाण्याचे तापमान १९०°अंश असून ह्या पाण्यात तांदूळ ओले करून फडक्यात बांधून ठेवल्यास त्याचे रूपांतर भातात होते. त्याचाच नैवेद्य भाविक मंदिरात देवीला दाखवितात व प्रसाद म्हणून खातात. जवळच गौरीकुंड असून त्यात गरम पाण्याचे झरे आहेत. ह्या कुंडात भाविक स्नान करून आपला श्रमपरिहार करतात. यमुना नदीच्या थंड पाण्यात स्नान करणे अवघडच आहे.

यमुनोत्री देवीचे मंदिर हे अमरसिंग थापा ह्या गुरखा राजाने बांधल्याचे सांगण्यात येते. दोनदा ह्याचा विध्वंस होऊन इ.स.१९०० मध्ये नरेश सुदर्शन ह्यांनी ते बांधले. परत मंदिर बऱ्याच धरणीकंपात नष्ट होऊन महाराणी गुलारिया ह्या जयपूरच्या महाराणीने ह्याचा जीर्णोद्धार केला. हिमालयस्थित हे मंदिर बर्फ वर्षावात जवळ-जवळ सहा महिने बंद असते. अक्षय्यतृतीया ह्या पवित्र दिवशी मोठ्या थाटामाटात मंदिर उघडतात व यम द्वितीयेला ते बंद करतात.

दि. ३१ मे २०१८ रोजी सकाळी ५.३० वाजता बारकोटहून निघून गंगोत्रीकडे रवाना झालो. रस्त्यात उत्तरकाशी येथे विश्वेश्वराचे दर्शन घेतले. उत्तरकाशीपासून ३५ किलोमीटरवर गणोर येथे मुक्काम केला. तेथे टेकडीवर असलेले शंकराचे मंदिर बघण्यास गेलो. आमच्याबरोबर असलेल्या श्री व सौ. वायपूरकर दांपत्याने व त्यांच्या मुलीने मंदिरात शिवाभिषेक केला. तेथे आम्हा मंडळींना तेथील पुजाऱ्याने शिवस्तुती ऐकविली. त्याचप्रमाणे श्रीरामचरितमानस मधील रामजन्म तसेच रावणजन्माची छोटीसी कथा श्री. मुजुमदार सरांनी सांगितली. सर्वांना फार आनंद झाला. रात्री मणेरलाच भगिरथी किनारी मुक्काम केला.



**गंगोत्री मंदिर आणि परीसर**

दुसऱ्या दिवशी दि. १ जून सकाळी ५.३० वाजता लवकर उठून गंगोत्रीकडे रवाना झालो. प्रवास खडतरच. वाटेत मध्येच गरम पाण्याच्या कुंडात स्नान करून दुपारी २.०० वाजता गंगोत्रीमातेचे दर्शन घेऊन परत मणेरला मुक्कामाला आलो. काय आहे ह्या गंगोत्री स्थानाचे महत्त्व ते बघू. चारधामातील हे दुसरे महत्त्वाचे स्थान. गंगोत्री ते गौरीमुख आणि तपोवनला जाण्याची सुरुवात होते. तेथूनच गंगेचा उगम होतो. हे मंदिर हिमालय पर्वत रांगेत साधारण ३१०० मीटर उंचीवर उत्तरांचल ह्या उत्तराखंडावर स्थित आहे. हिवाळ्यात हिमवर्षाव होत असल्याकारणाने हे मंदिर बंद असते. उन्हाळ्याच्या सुरुवातीला ते उघडते. २५० वर्षापूर्वी अमरसिंग थापा ह्याने हे मंदिर बांधले. सन १९०० मध्ये जयपूरच्या राजघराण्याने ह्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. गंगोत्री मंदिर भगीरथी नदीच्या तीरावर असून गंगामातेचे हे पवित्र स्थान आहे. भगीरथाने अपार तप करून आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्याकरिता गंगामातेला पृथ्वीवर आणण्याचा निश्चय केला. त्याचे तप बघून गंगामाता पृथ्वीवर अवतरण्यास तयार झाली. पण गंगामातेच्या अतिभव्य प्रवाहाच्या वेगाने पृथ्वीचा नाश होऊ नये यासाठी भगवान श्री शंकरानी तिला आपल्या जटेत धारण करण्याची तयारी दाखविली. श्री शंकराच्या जटांतून निघून गंगामाता पवित्र अशा गंगोत्री येथे प्रकट झाली. त्यालाच 'गंगाधाम' असे म्हणतात. सभोवताली देवदार आणि पाईन वृक्ष आहेत. गंगामंदिर पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाने बांधले आहे. ह्या मंदिरात गंगा, सरस्वती व अन्नपूर्णा मातेच्या मूर्ती असून हिमवर्षावात ह्या मूर्ती, मुख्वा ह्या मंदिरात ठेवतात. ह्या कालावधीत मंदिर बंद असले तरीही एक दीप तेवत ठेवला असतो. हा दिवा सहा महिने अविरत जळत असतो. ह्या दिव्यात भरपूर तेल असले तरीही भगिरथीच्या तेजाने आणि गंगामातेच्या ऊर्जेने तो तेथे कुणीही नसताना पूर्ण हिवाळ्यात तेवत असतो. ह्या नदीत स्नान केल्याने अथवा तिचे पाणी प्राशन केल्याने माणसाचे आयुष्य शुद्ध आणि पावन होते. सहा महिन्यानंतर गंगामातेचे प्रवेशद्वार उघडण्याचा प्रसंग फारच उत्तमतऱ्हेने साजरा केला जातो. सेमवाल वंशाच्या ब्राह्मणांच्या मंत्र घोषात व ह्याच वंशाच्या रजनीकांत ह्याच्या उपस्थित हा प्रसंग साजरा करतात. मंत्रघोष, सुंदर फुले, सुशोभित दिवे ह्या सर्वांनी मंदिर उघडले जाते. चारधाम यात्रेतील हे दुसरे पवित्र स्थान होय.

दि. २ जून २०१८ सकाळी पहाटे ४.३० वाजता मणेरहून निघून उत्तरकाशी मार्गे टेहरी डॅमला वळसा घालून केदारनाथाकडे रवाना झालो. रात्री ८.०० वाजता सीतापूर येथे मुक्काम केला. दि. ३ जून २०१८ सीतापूरहून केदारनाथ हे अंतर १८ किमी आहे. आमच्यापैकी जवळ-जवळ सातजणांनी घोड्याने प्रवास केला. केदारनाथला घोड्याने पोहचायला तीन तास लागले. ११.०० वाजता केदारनाथ मंदिराजवळ पोहोचलो. मंदिरात दर्शन घेण्यासाठी दर्शन रांगेत उभा राहिलो. जवळ-जवळ तीन तासाने केदारनाथ दर्शन झाले. मंदिर दर्शन घेऊन परत सीतापूरला रात्री ११.०० वाजता आम्ही मंडळातले सदस्य पायी चालत आलो. घोड्याचा प्रवास फारच खडतर होता. श्री. मुजुमदारांनी अगोदरच

गांभीर्य हे शहाणपण नावाच्या वृक्षावरची फक्त साल आहे; पण या सालीमुळे त्याचे संरक्षण होते - कन्फ्युशिअस

हेलिकॉप्टरचे बुकींग केले असल्यामुळे हा प्रवास त्रासदायक वाटला नाही. तरीसुद्धा सकाळी ५.०० वाजता निघून परत यायला दुपारचे ११ वाजले. ह्या ठिकाणी हेलिकॉप्टरची सोय आहे. पण त्याचे उड्डाण हवामानावर अवलंबून असते. परमेश्वर कृपेने त्या दिवशी उड्डाणाला अडथळा आला नाही.

काय आहे केदारनाथ हे आपण बघू.

केदारनाथ मंदिर हिमालय शिखरांच्या पर्वत रांगेत मंदाकिनी नदीपासून १७५५ मीटर उंचीवर स्थापित आहे. हे मंदिर पांडवांनी बांधले असल्याची आख्यायिका आहे. ८ व्या शतकात आद्यशंकराचार्यांनी पुनर्स्थापित केले आहे. शुभ्र पांढ्या संगमरवरी दगडांनी बांधलेले हे मंदिर शांती आणि एकता ह्यांचे प्रतीक आहे. त्रिशंकू आकाराची शिवमूर्ती गाभाऱ्यात स्थापित आहे. तर पूजेची मूर्ती सभामंडपात ठेवली आहे. त्याच मंदिरात पाच पांडव, द्रौपदी, भगवान श्रीकृष्ण, नंदा, वीरभद्र इत्यादी देवतांच्या मूर्ती आहेत. हिमवर्षावाच्या कालावधीत केदारनाथ मंदिर भाऊबीजेला बंद होऊन ते अक्षय्यतृतीयेला उघडले जाते. ह्या बंदच्या काळात शिवमूर्ती उरवीमठ ह्या ठिकाणी ठेवल्या जातात. सहा महिने ह्या मूर्तींचे वास्तव्य, पूजाअर्चा येथेच होते. ह्या मंदिराचे पुजारी वीरशीवा वंशाचे कर्नाटक प्रांतातील असतात. मंत्र देखील कानडी भाषेत म्हटले जातात. हे मंदिर केदारनाथ मंदिर समितीच्या आधिपत्याखाली असून तिची सर्व व्यवस्था हिच समिती पाहते. उत्तरप्रदेश सरकारच्या केदारनाथ मंदिर ॲक्टच्या अनुशंगाने ह्या समितीची स्थापना करण्यात आली आहे. गौरीकुंड ह्या ठिकाणाहून केदारनाथ मंदिर १८ किमी अंतरावर आहे. खालून वरून आणि वरुन खाली येण्या-जाण्यासाठी घोड्याची तसेच हेलिकॉप्टरची सोय आहे.

ह्या मंदिराच्या बाहेर एका पुजाऱ्याकडून आम्ही मंडळींनी केदारनाथची पूजा करून घेतली. मंदिर फारच भव्य आहे. महाप्रलयाच्यावेळी खूप पाणी येऊनही ज्या शीळेमुळे मंदिराला धक्का पोहोचला नाही ती शिळा पाहिली. केदारेश्वराचे दर्शन हा आमच्या बारा ज्योतिर्लिंगापैकी शेवटचे ज्योतिर्लिंग होते. त्याच्या दर्शनाने आम्हा मंडळींना खूप धन्य वाटते, नव्हे तर अलभ्य लाभ झाला. बारा ज्योतिर्लिंगाचे दर्शन झाल्याचे समाधान वाटले.

दि. ४ जून २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता सीतापूरहून निघून आम्ही मंडळी बद्रिनाथकडे रवाना झालो. मध्येच दुपारी ४.०० वाजता पिपलकोटी येथे मुक्काम केला. दि. ५ जून २०१८ रोजीपहाटे ५.३० वाजता पिपलकोटीहून बद्रिनाथकडे रवाना झालो. नागमोडी वळणे घेत सकाळी ११.०० वाजता बद्रिनाथला पोहोचलो. महाराष्ट्र सदन येथे श्री. बाबुलशास्त्री यांचेकडून श्री बद्रिनाथ आणि लक्ष्मीची कथा ऐकली. या सदनमध्ये आमचे सद्‌गुरू श्री. ब्रह्मचैतन्य महाराजांच्या फोटोचे दर्शन झाले. ते खरोखरच भाग्यच म्हणावे लागेल. ''जिथे तू जातो तेथे मीच तुझा सांगाती'' ह्या ओवीची प्रचीती आली. अलखनंदा नदीवर पूजाअर्चा करून बद्रिनाथजींच्या मंदिरात जाण्याच्या रांगत उभे राहिलो. साधारण दीडतासाने मंदिरात प्रवेश मिळाला. गर्दी खूपच होती. पण बद्रिनाथ आणि लक्ष्मीदेवीच्या मूर्तीचे दर्शन झाले. भारताच्या सीमेवरील शेवटचे गाव माणागांव पाहिले आणि गुप्त सरस्वतीदेवीचे दर्शन घेतले. माणागांवपासून पुढे चीनची सीमा आहे. पण ती फारच दूर आहे. बद्रिनाथ येथून दुपरी ३.०० वाजता निघून जोशीमठमार्गे पिपलकोटला पोहोचलो. रात्री तेथेच मुक्काम केला.

बद्रिनाथचा थोडासा इतिहास बघू. भारतात असंख्य देवदेवतांची मंदिरे आहेत. काही फारच अप्रतिम आहे. बद्रिनाथ मंदिर हे त्यापैकीच एक आहे. तुम्ही विष्णूभक्त असाल तर तुम्हाला ह्या मंदिरात येण्याची व तेथील

---

जो विपत्तीच्या वेळी दुःख करत बसत नाही आणि आपल्या नशिबाला दोष देत नाही,
तो खरा थोर पुरुष. - सिनेका

निसर्ग बघण्याची इच्छा झालीच पाहिजे. तेथे जाणे सहज आहे असे वाटते पण तिथला प्रवास फार खडतर आहे. हे तिथे गेल्यावरच कळू शकते. हे मंदिर १३ व्या शतकात बांधले गेले आहे. १३ किमी व्यास असलेले हे मंदिर उत्तराखंडातील चमेलीपासून ३१३३ मीटर उंचीवर आहे. भारतातील चार मुख्य धामांपैकी (जगन्नाथपुरी, द्वारका, बद्रिनाथ, रामेश्वर) बद्रिनाथ एक धाम आहे. अलखनंदा नदीच्या तीरावर नैना पर्वत व तप्तकुंडाजवळ आहे. ह्या कुंडात गरम पाण्याचे झरे आहेत. ह्यात स्नान करूनच भाविक बद्रिनाथच्या दर्शनाला जातात.



**बद्रिनाथ मंदिर आणि परीसर**

बद्रिनाथ हे नाव का पडले ह्याची माहिती थोडक्यात बघू. बद्री नावाचे एक रानफळ आहे. भक्तांच्या विश्वासासाठी एक कहाणी सांगतात की, भगवान विष्णू तप करण्यासाठी बद्रिजण्य पर्वतावर बसले होते. त्यावेळी लक्ष्मीमातेने बद्री वृक्षाचे रूप धारण करून भगवंताला सूर्याच्या उष्णतेपासून रक्षण केले. म्हणून भगवंताला बद्रिनाथ असे म्हणतात. आत्मज्ञान आणि शांतीच्या शोधात भक्तगण बद्रिनाथला उपासना करतात. उत्तराखंडातील चारधामातील व भारतातील मोठ्या चारधामांपैकी बद्रिनाथ एक आहे. भारतातील पौराणिक कथेतील पुनर्जन्माची कथा येथे समाप्त होते. ह्या अर्थ एखादी व्यक्ती बद्रिनाथला येऊन गेल्यावर त्याला मुक्ती मिळते म्हणजे त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. ह्या मंदिरात बद्रिनाथ ब्रह्मा, विष्णू, महेश काली गुरू ह्यांच्या प्रतिमेच्या रुपात दिसतात. ह्या मंदिरातसुद्धा सहा महिने अविरत तेवत राहणारा द्वीप प्रज्वलीत असतो.

स्कंदपुराणातील कथेनुसार आदिगुरू शंकराचार्यांनी नारद कुंड येथे येऊन ह्या मंदिराची स्थापना केली. त्यावेळी भगवंतावरील आणि हिंदूधर्मावरील श्रद्धा लोपत चालली होती म्हणून ह्या मंदिराची स्थापना झाली. ह्या ठिकाणी पर्वताचे एक शिखर बद्रिविशालजवळ आहे. त्याला स्वर्गरोहिणी किंवा 'स्वर्गपथ' असे म्हणतात. विष्णूभक्त नारदमुनींना येथेच आत्मज्ञान व मुक्ती मिळाली. भगवान श्रीकृष्णांना बद्रिनाथ हे स्थान फार आवडते. कपीलमुनी, गौतम, कश्यप, श्रीमाधवाचार्य, नित्यानंद इत्यादी व इतर अनेक बुद्धीमान ऋषीमुनींनी मानसिक शांती व समाधानासाठी येथे तपस्या केल्या आहेत. म्हणून बद्रिनाथला एकदा आपण यायलाच पाहिजे.

दि. ६ जून २०१८ रोजी पहाटे ५.३० वाजता आम्ही मंडळी पिप्पलकोटहून निघून हरिद्वारकडे निघालो. मध्येच रस्त्यात अलखनंदा आणि भगिरथी ह्या दोन नद्यांचा संगम बघितला. ह्यालाच 'रुद्रप्रयाग' म्हणतात. दुपारी २.३० वाजता ऋषीकेशला पोहोचलो. येथे लक्ष्मणझुला, गीताभवन, रामेश्वर मंदिर इत्यादी ठिकाणे पाहिली. सायंकाळी ७.०० वाजता ऋषीकेशहून निघालो. ८.३० वाजता हरिद्वारला पोहोचलो. हा आमचा परतीचा प्रवास होता. रात्रीचा मुक्काम हा हरिद्वारलाच होता. आपण ऋषीकेशबद्दलची माहिती थोडक्यात पाहू. चारधाम यात्रेच्या शेवटच्या टप्प्यात येणारे हे स्थान आहे. हरिद्वारपासून अवघे १३ किमीवर अंतरावर आहे. हे स्थान गंगामातेच्या विशालपात्रांच्या दोन तीरांवर आहे. एका पात्रावरून दुसऱ्या पात्रावर जाण्यासाठी लक्ष्मणझुल्याचा वापर केला जातो. थोड्या अंतरावर रामझुला पण आहे. ह्या दोन्ही झुल्यांचा राम लक्ष्मण

ह्या नावांव्यतिरिक्त फारसा संदर्भ नाही. गंगा मातेच्या दुसऱ्या तीरावर भव्य गीता मंदिर आहे. ह्या मंदिर परिसरात एकमुखी रुद्राक्षाचे विशाल झाड आहे. ऋषीकेशच्या जवळपास पर्यटकांसाठी बरीच प्रेक्षणीय स्थळे आहेत. गंगामातेच्या भव्य पात्रातून येण्याजाण्यासाठी मोठमोठ्या नावा असतात. बरेच पर्यटक हे गंगा विहार करताना दिसतात. हरिद्वार इतकेच ऋषीकेश हे पवित्र स्थान आहे. येथेही हरिद्वार प्रमाणेच रोज सायंकाळी गंगामातेची आरती होत असते. ती फारच प्रेक्षणीय असते.

दि. ७ जून २०१८ रोजी पूर्वी ठरलेल्या कार्यक्रमांनी मनवादेवी व चंद्रादेवी ह्या मंदिरांची भेट राहिली होती. ती ७ जून रोजी केली. दोन्ही ठिकाणे ही खूपच उंचावर असल्याकारणाने रोपवेचा वापर करावा लागतो. दोन्ही ठिकाणी खूप गर्दी होती. पण ही दोन्ही देवीची ठिकाणे फारच प्रेक्षणीय आहेत.

दि. ८ जून २०१८ रोजी सकाळी ६.०० वाजता जनशताब्दी एक्सप्रेसने ११.०० वाजता नवी दिल्ली स्टेशनवर पोहोचलो. तेथून १.३० वाजता हजरत निजाम्मुदिन स्टेशनवरून पणजीला जाणारी गाडी पकडून ९ जूनला सकाळी १०.०० वाजता मनमाडला उतरलो. तेथून दुपारी २.०० वाजता गोरखपूर एक्सप्रेसने कल्याणला सायंकाळी ७.३० वा. पोहोचलो. तेथून सर्वांचे मार्ग वेगवेगळे झाले. आम्ही सर्व मंडळी साधारणपणे ९.०० वाजता आपआपल्या घरी सुखरूप पोहोचलो. प्रवास फारच खडतर होता पण परमेश्वर कृपेने तो सुखरूपपणे यशस्वी झाला. परमेश्वराचे खूप खूप आभार!

**– चंद्रकांत शिंगाडे**
तंत्रनिकेतन, ठाणे
भ्रमणध्वनी – ८१०८४१७३९५

•••

(पृष्ठ क्र. २४ वरून – **श्रीलंकेतील घटनात्मक पेचप्रसंग**)

परंतु चीनचे सर्वच प्रयत्न अयशस्वी झाले. आता पुन्हा राजपक्षे सत्तेवर आले आहेत. त्यामुळे ते पुन्हा एकदा चीनला जवळ करतील की काय असे प्रश्न निर्माण होणार आहेत. तसे झाल्यास त्याचे भारताबरोबरच्या संबंधातही परिणाम होणार आहेत. अमेरिकेनेदेखील या घडामोडींवर नाराजी व्यक्त केली आहे. न्यू यॉर्क टाईम्स आणि वॉशिंग्टन पोस्ट या अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या प्रख्यात वर्तमानपत्रातून देखील सिरीसेना यांच्या निर्णयावर टीका केल्याचे दिसून आले आहे. चीनची श्रीलंकेबरोबरची वाढती जवळीक ही अमेरिकेला भुवया उंचावायला लावणारी आहे. कारण श्रीलंकेचे हिंदी महासागरातील सामरिक स्थान आणि समुद्रातील सी लेन्स या श्रीलंकेच्या माध्यमातून जात असल्याने याचा वापर चीन हा आपल्या लष्करी प्रशिक्षणासाठी करू शकतो. चीनचे बस्तान तिथे बसले तर अमेरिकेसह भारत आणि इतर देशांसाठी ते त्रासदायक ठरणार आहे. त्यामुळे अमेरिकेनेदेखील या संपूर्ण प्रकरणावर नाराजी व्यक्त केली आहे. ही अंतर्गत घडामोड आणि येणारी राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक या सर्वांचा परिणाम श्रीलंकेच्या अंतर्गत राजकारणावर आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणार आहे. विक्रमसिंघे यांना लोकांचे समर्थन मोठ्या प्रमाणावर आहे; पण केवळ सर्व पक्षांनी एकजूट केल्याने त्यांच्या पराभव झाला. राजपक्षे दहा वर्षे सत्तेवर होते. आता पुन्हा राजपक्षे यांच्याकडे सत्तेचे केंद्रीकरण झाले तर भारताच्या चिंता भविष्यात नक्कीच वाढणार आहेत.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

•••

मोठ्या लोकांच्या अंगचे दोषही मोठे असतात. – थॉमस ड्रेक्स

# नाशिक रागमाला : मराठ्यांच्या कलासक्ततेची साक्ष

*म. स. माटे व उषा रानडे यांनी लिहिलेल्या 'नाशिक रागमाला' या ग्रंथात मराठा चित्रकलेची अत्यंत तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. प्रस्तुत लेख या ग्रंथाच्या प्रस्तावनेवर आधारित आहे. - संपादक*

मराठा साम्राज्याचा वीरश्रीने भरलेला इतिहास वाचताना मराठ्यांच्या शौर्याची चुणूक जागोजागी पहायला मिळते. सह्याद्रीच्या कड्याकपारीतून स्वराज्याचं तोरण बांधण्यासाठी निघालेल्या मावळ्यांनी 'हे राज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा' असं म्हणणाऱ्या छपती शिवाजी महाराजांना साथ देत 'महाराष्ट्र धर्म' जागवला. मराठा साम्राज्य बऱ्याच अंशी सुजलाम सुफलाम होतं. शौर्य व वीरश्री संचारलेला हा समाज स्वभावाने कलेवर प्रेम करणारा देखील होता. दुर्दैवाने इतिहास संशोधक व लेखकांनी मराठ्यांच्या सौंदर्यासक्ततेवर व कलासक्ततेवर एक प्रकारचे दुर्दैवी मौन पाळले आहे. त्यामुळे मध्ययुगीन महाराष्ट्रातील चित्रकला, भित्तीचित्रं, हस्तलिखितं यामधून दिसणारी मराठी साम्राज्याची कलासक्तता दीर्घकाळ दुर्लक्षित राहिली. एब्लिंग या इंग्रजी चित्रसमीक्षकाने १९७३ साली मध्ययुगीन महाराष्ट्रातील काही चित्रांचा एक संच प्रकाशित केला. मात्र हेन्रिगोएन्स याने चित्रकला 'मराठा संप्रदाय' असण्याच्या शक्यतेवर भाष्य केले. बडोदा येथील वास्तुसंग्रहालयाचा व्यवस्थापक असताना गोएत्स याने मराठा राजेरजवाड्यांच्या कलासक्ततेचे अत्यंत जवळून अध्ययन केले. १८ व्या शतकातील अनेक कागदपत्रांचा त्याने धांडोळा घेतल्यावर त्याच्या असे निरीक्षणात आले की, मराठा रियासतीत अनेक देवळांच्या, इमारतींच्या, बांधकामांच्यावर झालेल्या खर्चाचे उल्लेख बखरीमध्ये झाले आहेत. राजप्रासाद, मंदिरं, भिंतीवरील सुंदर भित्तीचित्रे, रंगकाम आदींचा उल्लेख अनेक बखरीत व कागदपत्रांमध्ये झालेला आढळला. याचं आकलन करताना गोएत्सला असं वाटलं की, मराठ्यांनी त्यांची अशी एक स्वतंत्र चित्रकलेची शैली विकसित केली आहे.

इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी १९४२ ते १९५२ या कालखंडात मराठा शैलीची अनेक चित्रे प्रकाशित केली. नागपूरच्या भोसले यांच्या राजप्रसादात शाकुंतलाचं रंगीत हस्तलिखित सापडलं, ज्यात स्थानिक चित्रकलांचा वापर असल्याने वेगळ्या मराठा शैलीची शक्यता निर्माण झाली. १९५७ साली बॅनर्जी यांनी ही शाकुंतलाची प्रत छापली. मराठ्यांच्या कलासक्ततेचा वेध घेत प्रा. सांकलिया यांनी माळवा प्रांतातील महेश्वर येथील मराठा रियासतीत साकारलेली अनेक शिल्पं व स्मारकं पाहिली.



१९८९ साली म. श्री. माटे यांच्या सहकार्याने डेक्कन कॉलेजने 'मराठा चित्रकला' या विषयावर संशोधन अभियान

चालू केले. मराठाशासित अनेक ऐतिहासिक शहरांचा अभ्यास करण्यात आला. पुणे, वाई, नाशिक, श्रीगोंदा, सासवड, धावडशी, जोतिबा, त्र्यंबकेश्वर, नेवासे, टोके इत्यादी शहरांचा यात समावेश होतो. चव्हाण व रानडे यांनी १९७९ मध्ये 'मध्ययुगीन मराठा कला' या विषयावर एक शोधप्रबंध लिहिला.

'मराठा भित्तीचित्रे' या शीर्षकाचा कमल चव्हाण यांचा शोधप्रबंध एक महत्त्वाचा ऐतिहासिक ऐवज आहे. १७४० ते १८१५ या काळातील वाई, मेजावली, नाशिक, चान्दोर, निपानि, मोरगाव, पांडेश्वर, बेनावडी येथील मंदिरांचा अभ्यास करून त्यावर रेखाटलेल्या भित्तीचित्रांचा अभ्यास या प्रबंधात मांडला आहे. या चित्रात प्रामुख्याने पौराणिक चित्रे, गणेश, सरस्वती, दशावतार, रिद्धिसिद्धी, कृष्णचरित्र इत्यादी विषयांवरील चित्रे आढळतात.

या भित्तीचित्रांच्या अभ्यासाने सरसकट माळवा व राजस्थान येथील एकच कला संप्रदाय अस्तित्वात नसून महाराष्ट्रातील चित्रकलेचा एक देशी प्रकार प्रकाशात आला.



भित्तीचित्रांच्या सोबत हस्तलिखिताचा समावेश मराठा चित्रशैलीच्या ऐतिहासिक साधनात होतो. मराठा राजघराण्याकडे उपलब्ध असलेल्या चित्रमय हस्तलिखित ग्रंथाचा अभ्यास करून डॉ. उषा रानडे यांनी 'Late Medieval Manuscript Illustrations of Deccan' या विषयावर पीएचडीचा प्रबंध लिहिला. या प्रबंधात मराठा राजघराण्यातील संग्रहातील गीता, सप्तशती, ज्ञानेश्वरी, भागवत व रुक्मिणी स्वयंवर आदी ग्रंथांच्याचित्रमय हस्तलिखितांमध्ये रेखाटलेल्या अनेक चित्रांमध्ये मराठा शैलीचे कपडे, पेहराव, घरांची बांधणी, चेहरेपट्टी यांचे स्पष्ट चित्रण होते. रानडे व माटे यांनी मराठा चित्रशैली संदर्भात केवळ पश्चिम महाराष्ट्राचाच अभ्यास केला असून विदर्भ व मराठवाडा अजून अभ्यासाच्या प्रतिक्षेत आहे.

यापुढील महत्त्वाचे ऐतिहासिक साधन म्हणजे लघुचित्र (miniature) होय. पुणे, सातारा, श्रीगोंदा, पैठण, तासगाव, वाई इत्यादी मराठाशासित शहरांमध्ये अनेक लघुचित्रं सापडतात. शिंदे व होळकरांनी चांदवड व श्रीगोंदा ही गावे समृद्ध केली; तर पटवर्धन कुटुंबाने तासगावचा कायापालट केला. नाशिक व वाई या दोन स्थानांना धार्मिक महत्त्व असल्यामुळे इथे अनेक कुटुंबांनी कलेची उपासना केली. नाशिकला लाभलेल्या गोदावरी नदीचा पावन सहवास व रामायणातील पंचवटीचे उल्लेख यामुळे नाशिकला एक वेगळेच ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व मिळाले.

या नाशिक शहरातच मराठ्यांच्या चित्रकलेच्या वेगळ्या शैलीचा विकास झाला. रागमाला : उद्गम व विकास : भारतीय संगीतशास्त्रात उल्लेखिलेल्या अनेक रागांचे चित्रांमध्ये मनुष्यरूपाने रेखाटन करून तयार केलेल्या चित्रांना 'रागचित्र' म्हणतात. अनेक रागांच्या वेगवेगळ्या रूपांचे चित्रण करून अनेक रागमाला अस्तित्वात आल्या. वाल्ड्समिट याने रागमालेची व्याख्या 'miniatures inspired by musical melodies' अशी केली आहे.

'रागमाला' या ग्रंथाचा कर्ता हा रेवा येथील जायलेन्द्र या राजाच्या दरबारी असलेल्या 'क्षमकर्ण' हा पंडित असून त्याने १३७९ साली हा ग्रंथ सिद्ध केला. या ग्रंथाचा प्रभाव भारतात सर्वदूर सापडणाऱ्या रागमाला चित्रांवर विलक्षण जाणवतो.

रागमालेचा उल्लेख किताब-ए-नौरस (नासिर हुसेन, १९५६) व तारिक-ए-हुसेनशाही या भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथील अप्रकाशित हस्तलिखितात सापडतो. सोळाव्या शतकातील अनेक रागमाला स्टूक व खंडालवाला यांच्या १९५९ साली प्रकाशित झालेल्या 'लॉड रागमाला' या ग्रंथात आहेत. बिजापूरचा अदिलशहा देखील स्वतः चित्रकार होता. त्याले 'अशर महाल' व 'कुमांतगी' या ऐतिहासिक वास्तूंवरील रेखाटलेल्या चित्राला रागमालेच्या दृष्टीने महत्त्व आहे.

मध्ययुगीन भारतात १५ ते १९ व्या शतकापर्यंत गोदावरीच्या उत्तरेकडील प्रांतात रागमाला चित्रांचा प्रादुर्भाव आढळतो. दक्षिण गोदावरी परिसरात गोवलकोंडा, हैद्राबाद, अहमदनगर, बिजापूर येथील अनेक लघुचित्रांत रागमालेचा उल्लेख आहे.

**संगीत शास्त्रातील रागकल्पना :**

संगीताची सुरुवात शिव ब्रह्मदेवापासून झाली असे मानण्यात येते. जैनमतानुसार प्रथम तीर्थंकर हे आदिनाथ असून त्यांच्यापासून संगीत उगम पावले असेही म्हणतात. भरतमुनीच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात 'भाषा' व 'गीती' असे प्रकार पाडले आहेत. मातंगऋषींच्या बृहद्देशी (५००-७००A.D.) या कालखंडातील ग्रंथात राग व त्याची व्याख्या आहे. नारद (इ.स. ७-९ A.D.) या ऋषींचा 'संगीत मकरंद' हा ग्रंथ मोलाचा आहे. यात 'राग' व 'रागिणी' यांचा उल्लेख आहे. या ग्रंथात रागांची दोन प्रकारे विभागणी केली आहे.

१. आठ मुख्य राग व तीन उपराग असे एकूण ३२ राग भूपाल, भैरव, श्री, परमंजरी, नाट, बंगाल, वसंत व मालव हे ते आठ राग.

२. सहा मुख्य राग - श्री, पंचम, मेघ, नट-नारायण, वसंत व भैरव. उपराग मिळून ४२ राग.

नारदांनी सर्वप्रथम रागांची लिंगानुसार स्त्री, पुरुष अशी विभागणी केली.

मम्मटाने 'संगीत रत्नमाला' (९ ते १३ वे शतक) या ग्रंथात कर्नाट, नाट, मेघमल्हार, देशाखा, मालव व वसंत अशी रागांची विभागणी केली. सोमेश्वर देव यांचा १२ व्या शतकातील 'रागदर्पण' हा ग्रंथ देखील महत्त्वाचा आहे. श्री, वसंत, भैरव, पंचम, मेघ, नरनारायण या रागांचा उल्लेख यात आढळतो.

१३ व १४ व्या शतकात रागांच्या अनेक ग्रंथांची निर्मिती झाली व रागांचं कुटुंब विस्तारत गेलं. पुढे रागांना पत्नी, मुलं बाळं, नातवंडं व सुना आल्या व रागांचा एक मोठा परिवार झाला.

पुढे श्रीमद्भागवत या ग्रंथाचा प्रभाव चित्रकलेवर जाणवू लागला. 'श्रीराग' या रागाचं चित्रण करताना



कृष्ण व राधा यांचा शृंगार फुलू लागला. मेघमल्हार व हिंदोल या रागांवर गोपिका श्रीकृष्ण व राधा यांच्या चित्रांचा

प्रभाव दिसू लागला. भागवतातील कृष्ण चरित्राची भुरळ रसिक मनावर होतीच. मानव जीवनातील रोजच्या प्रसंगाला दैवी अनुभूतीचा स्पर्श कृष्णचरित्राने केला. ज्यामुळे कुठलेही दोन प्रेमी एकत्र आले की त्यांना राधाकृष्णाचं स्वरूप मानून चितारलं जाऊ लागलं.

भानुदत्तच्या 'रसमंजिरी' या ग्रंथात नायक व नायिकाभेद सांगून रागाची तद्नुशंगाने विभागणी झाली. पुढे वैदिक व पौराणिक कथा अपुऱ्या पडू लागल्या म्हणून केशोदास या कवीच्या 'रसिकप्रिया' या ग्रंथाचा उपयोग चित्र काढण्यासाठी झाला.

काळाच्या ओघात विशिष्ट राग विशिष्ट प्रसंगी वा विशिष्ट काळी गाण्यात येऊ लागले. राग व वेळ यांची घट्ट वीण बसली. एखादा राग गाण्यात आल्यास नकळत विशिष्ट प्रसंग व भाव जागृत होऊ लागला. या सोबतच एखादा राग एखाद्या विशिष्ट देवतेला, पौराणिक प्रसंगाला व ऐतिहासिक घटनेला जोडण्यात येऊ लागला.

भरतमुनींच्या रससिद्धांताचा रागाच्या रसनिष्पत्तीवर खूप प्रभाव जाणवतो. 'विभावानुभाव व्यभिचारी भावात् रसनिष्पत्तीः' या भरतमुनींच्या रससूत्रानुसार 'रसनिष्पत्ती' ही रागांच्या गायनाची फलनिष्पत्ती आहे.

रत्युत्साहभयक्रोध जुगुप्सा शोक विस्मयाः
शमहासाविति स्थायिभावा नवरसास्थिता ।।
शंगारेच रति स्थायी वीरोत्साहसंज्ञकः।
भऽयानके भयं भाति रौद्रे क्रोधगुणोदयः
बीभत्सेऽपि जुगुप्सायात् करुणे शोक उच्यते
अद्भुते विस्मयो नाम शान्ते शम समुद्गम
हास्ये हास्य इति स्थायिभावाः स्वेषु रसेष्वपि।।

रस व त्यांचे स्थायिभाव हे अत्यंत महत्त्वाचे असून भरतमुनी याचा ऊहापोह करतात.

| रस | स्थायीभाव |
|---|---|
| शृंगार | रती |
| वीर | उत्साह |
| भयानक | भय |
| रौद्र | क्रोध |
| बीभत्स | जुगुप्सा |
| करुण | शोक |
| अद्भूत | विस्मय |
| शांत | शम |
| हास्य | हास |

मानसाच्या स्वभावात सुप्त अवस्थेत असलेल्या रती, उत्साह, भय, क्रोध इत्यादी स्थायी भावांना चित्राच्या माध्यमातून उद्दीपीत करून शृंगार वीर करुणा आदी रसांची निर्मिती करणे हे चित्रकेलेचे प्रयोजन आहे असे मानण्यात आले.



शुभंकर या महत्त्वाच्या पंडिताने १५ व्या शतकात 'संगीत दामोदर' या ग्रंथात रागांची परिणती ही रसनिष्पत्ती आहे असे सांगितले. रागाचे गायन हे रसांचा परिपोष करणारे असावे.

रागमालेच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'संगीत सार' (१६५० A.D.) हा ग्रंथ. या ग्रंथात शंभराहून

अधिक राग दिले आहेत. शारंददेवाच्या 'संगीत रत्नाकर' या ग्रंथात शुद्ध राग, संधी राग, ग्राम राग, उपराग, जनकराग अशी विभागणी आढळते. याचे प्रतिबिंब मध्ययुगीन चित्रकलेत पहायला मिळते ते राग, रागवधू, रागपुत्र यांच्या रेखाटनाच्या निमित्ताने. 'कल्पसूत्र' या ग्रंथात (१५ वे शतक) हस्तलिखितात पहिले रागचित्र सापडले. या ग्रंथात प्रथम रागांनी वेगवेगळ्या मुद्रा, आयुधे धारण केली असून वाचनाचार्य शुद्ध कैलास यांच्या 'संगीतोपनिषद् सारोद्धार' (१३०३ A.D.) या ग्रंथात रागांना यक्ष, यक्षिणी, गंधर्व, सुर सुंदरी असे रेखाटले आहे. अग्रवाल व कुमारस्वामी या कलासमीक्षकांच्या मते या यक्ष गंधर्वाच्या चित्रांमुळेच पुढे त्यांना मुर्तीपूजेत स्थान मिळाले.

पुढे कल्पसूत्रात सांगितल्याप्रमाणे राग केवळ स्थिर (Iconic) चित्र राहिली नसून पुढे त्यांना वेगवेगळ्या प्रसंगात रेखाटण्यात येऊ लागले. वाल्ड्समित्सची बर्लीज् रागमाला (१९६७) व लॉड रागमाला (१९५३) ही याची उदाहरणे होत. राजस्थानी व पहाडी चित्रकारांनी आपल्या शैली विकसित करत चित्र, रंगसंगती आकर्षक करून अनेक नवनवे प्रसंग रागमालेत रेखाटले.



रागार्णव, संगीत दामोदर, रागसागर इत्यादी ग्रंथांची रचना होताना इसवी सनाच्या १५ व्या शतकाच्या शेवटी ६ मुख्य राग व ५/६ रागिणी, उपराग मिळून ३६ किंवा ४२ राग स्थिर झाले.

शुभंकर या 'संगीत दामोदर' या ग्रंथाच्या कर्त्याकडून रागांचे प्रयोजन हे रसनिष्पत्ती आहे असे म्हटले गेले. परंतु पुढे हा विचार थांबला. मुघलोत्तर काळात कलेचे भोक्ते, दरबार व कलाकारांत वाढ झाल्यामुळे नावीन्याच्या शोधात परंपरेशी नातं तुटलं व केवळ चित्रकला उरली. त्यातून रसनिष्पत्ती झाली नाही. या परंपरेशी तुटलेपणामुळे संभ्रम निर्माण झाला. 'नाशिक रागमाला' या संभ्रमातील काळाचं प्रतिनिधित्व करते असे म्हणावे लागते.

**नाशिक रागमाला**

नाशिक रागमालेचा शोध हा मराठा चित्रशैलीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. म. श्री. माटे यांनी ४४ रागचित्रांचा शोध लावला. या रागमाला क्षेमकर्णाच्या 'रागमाला' या ग्रंथावर आधारित आहेत. क्षेमकर्णाच्या म्हणण्यानुसार ८६ चित्रांचा हा रागचित्रांचा संच असावा. पण ४४ रागचित्रेच सापडली असून उरलेली ४२ चित्रे अजून हाती आली नाहीत. यातील काही चित्रं नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयात असून काही महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व शास्त्रविभागात आहेत. क्षेमकर्णाच्या 'रागमाला' या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत 'अनुप संस्कृत ग्रंथालय, बिकानेर', एशियाटिक सोसायटी ग्रंथालय, कलकत्ता व इंडिया हाऊस ग्रंथालय लंडन येथे आहे. क्षेमकर्णाची रागमाला सहा रागांबद्दल विस्ताराने बोलते :

रागादौ भैरवाक्ष्यस्तदनुनिगदितो मालकौशिर्द्वितीयो
हिंदोलो दीपकश्च श्रीरपिच बुधैरंबुदाख्यक्रमेण।।

हाच श्लोक नाशिक रागमालेत वेगळा आहे.

भैरवः कौशिकश्चैव हिंदोलो दीपकस्तथा
श्रीरागो मेघरागश्च षडैते पुरुषोत्तमाः।।

**नाशिक रागमालेची काही वैशिष्ट्ये**

नाशिक रागमालेमध्ये पिवळा व लाल यांचा

गडदपणे वापर जाणवतो. सोनेरी रंग पूर्णपणे गैरहजर असून १८ व्या शतकातील मराठी शैलीची राजवाडे, मंदिरे, इमारती यांचे चित्रण येथे आढळते. 'तरंगहस्ता' म्हणजे बाल्कनीचे चित्रण आढळते. ही तरंगहस्ता विश्रामबागवाडा पुणे येथे पहायला मिळते. वृक्ष, झुडपे, मोकळी जागा, डोंगराळ भाग इत्यादी गोष्टी चित्रांमध्ये पहायला मिळतात जे मध्ययुगीन चित्रकलेचे वैशिष्ट्य आहे.

चित्रातील स्त्रियांनी व पुरुषांनी घातलेले कपडे लक्ष वेधून घेतात. खास अशा मराठी पेहरावाचे दर्शन नाशिक रागमालेत होते. 'अंगरखा', 'पुणेरी पगडी', पुण्याच्या दरबारातील अनेक कपडे यांचं चित्रण येथे आढळते. सोनेरी रंग वापरला नाही, पण जरीचे काम केले आहे. 'साडी' या वस्त्राचे चित्रण अगदी सौंदर्यदृष्टीने केले आहे. संपूर्ण अंग झाकले जाऊन देखील स्त्रीच्या सर्वांग सौंदर्याचे दर्शन साडीतून केले असून, राजा रवी वर्माने साडीच्या मनमुक्तपणे केलेल्या चित्रणाची आठवण येते.

स्त्रियांची आभूषणे ही मराठी शैलीची असून मोत्यांचे हार, गळ्याभोवती व डोळ्यांभोवती पण हार आहेत. बांगड्या, कंठहार, नथ, पैंजण, कानातील बाळी, बुगडी, कुर्डु या आभूषणांचा यात वापर केला आहे.



स्त्रियांच्या केशकलापामध्ये अंबाडा, खोचा इत्यादी चित्रित केला आहे.

या चित्रांमधील स्त्रियांचे नाक एकदम सरळ आहे, पुरुष व स्त्रियांची उंची लहान आहे. हात शरीराच्या मानाने लहान आहेत.

म. श्री. माटे यांना मिळालेल्या चित्रांमध्ये राग, रागवधू, रागपुत्र चित्रित केले असून राग व रागिणी खालील प्रकारे आहेत.

१. रागमाला प्रारंभ : गणपती स्तुती
२. राग भैरव (प्रथम मुख्य राग)
३. रागिणी बंगाली (भैरव रागाची प्रथम पत्नी)
४. रागिणी भैरवी (दुसरी पत्नी)
५. रागिणी वेलावली (तिसरी पत्नी)
६. रागिणी पुष्यकी (चौथी पत्नी)
७. रागिणी स्नेहा (पाचवी पत्नी)
८. राग बंगाल (भैरव रागाचा पहिला मुलगा)
९. राग मधू (तिसरा मुलगा)
१०. राग हर्ष (चौथा मुलगा)
११. रागिणी मधू माधवी (नववी मुलगी)
१२. राग गांधार (दहावा मुलगा)
१३. राग मालकौशिक (द्वितीय मुख्य राग)
१४. राग हिंदोल (तृतीय मुख्य राग)
१५. रागिणी देवगिरी (हिंदोळाची दुसरी पत्नी)
१६. रागिणी वासंती (हिंदोळाची तृतीय पत्नी)
१७. रागिणी सिंदुरी (हिंदोळाची चौथी पत्नी)
१८. रागिणी अभिरी (हिंदोळाची पाचवी पत्नी)
१९. रागिणी शुभ्रांग (हिंदोळाचा तिसरा मुलगा)
२०. राग आनंद (हिंदोळाचा चौथा मुलगा)

२१. राग वसंत (हिंदोळाचा सातवा मुलगा)
२२. राग विनोद (हिंदोळाचा आठवा मुलगा)
२३. राग दीपक (चौथा मुख्य राग)
२४. रागिणी कामोदिणी (दीपक रागाची प्रथम पत्नी)
२५. रागिणी पटमंजरी (दुसरी पत्नी)
२६. रागिणी तोडी (तिसरी पत्नी)
२७. रागिणी गुर्जरी (चौथी पत्नी)
२८. रागिणी कांकशेली (पाचवी पत्नी)
२९. राग कमल (दीपक रागाचा पहिला मुलगा)
३०. राग लाहूल (सहावा मुलगा)
३१. राग चंपक (सातवा मुलगा)
३२. राग हेमाल (आठवा मुलगा)
३३. राग श्री (पाचवा मुख्य राग)
३४. रागिणी गौडी (श्री रागाची चौथी पत्नी)
३५. रागिणी रामकारी (पाचवी पत्नी)
३६. रागिणी सैंधवी (सहावी पत्नी)
३७. रागिणी खंबावती (सातवी पत्नी)
३८. राग मालव (श्री रागाचा तिसरा मुलगा)
३९. राग गौड (श्री रागाचा चतुर्थ मुलगा)
४०. राग मेघ (सहावा मुख्य राग)
४१. रागिणी मल्लारी (मेघ रागाची प्रथम पत्नी)
४२. रागिणी सोरठी (मेघाची दुसरी पत्नी)
४३. रागिणी सुहावी (मेघाची तिसरी पत्नी)
४४. रागिणी आसावरी (मेघाची चौथी पत्नी)
४५. रागिणी जोगी-आसावरी (मेघाची पाचवी पत्नी)
४६. रागिणी कौंकिणी (मेघाची सहावी पत्नी)
४७. रागिणी ककुभी (मेघाची सातवी पत्नी)
४८. रागिणी घोरिणी (मेघाची आठवी पत्नी)
४९. रागिणी नटबिल्वली (मेघाची नववी पत्नी)
५०. रागिणी हिजेजी (मेघाची दहावी पत्नी)
५१. राग कर्णाट (मेघाचा पाचवा मुलगा)
५२. राग विहाग (मेघाचा सहावा मुलगा)
५३. राग जालंधर (मेघाचा सातवा मुलगा)

उपरोक्त रागांमध्ये अशा अनेक नवीन रागांचा उल्लेख आहे ज्यांचा उल्लेख क्षेमकर्णाच्या 'रागमाला; या ग्रंथात आढळत नाही. अनेक रागांचे द्वित्व आढळते. काही रागांचे चित्रण अपूर्ण केले आहे. रागांची संख्या ५३ असून या रागमालेतील पात्रांची संख्या ६१ आहे. यात अनेक रागांचे चित्रण पुन्हा पुन्हा करण्यात आले आहे.

चित्रांमधील प्राणी व पक्षी हे सुंदरपणे रेखाटले आहेत. विशेष म्हणजे हत्तीचे चित्रण सुरेख आहे. वेगवेगळ्या फुलांचे रेखाटन व फुलांच्या अनेक रंगविलासाचे चित्रण सुरेख केले असून यावरून मेवाडच्या चित्रशैलीची नकळत छाप जाणवते. मात्र महाराष्ट्रातील रंगभूषा, वेशभूषा, इमारती इत्यादी सांस्कृतिक बाबींचे नाशिक रागमालेतील चित्रण पाहता हा अस्सल मराठी चित्रशैलीचा उत्तम नमुना आहे असे म्हणावे लागते.

नाशिक रागमालेच्या चित्रशैलीमुळे महाराष्ट्रात चित्रकलेची एक स्वतंत्र 'मराठा शैली' होती हे सिद्ध होते.

**- प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

मराठी विज्ञान परिषद व महाराष्ट्र सांस्कृतिक संचालनालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक गटात शाळेतील इ.९वीच्या विद्यार्थ्यांनी 'शास्त्रज्ञांचा जीवनपरिचय' विषयावर आधारित 'मायकेल फॅरेडे' ही एकांकिका सादर केली. अंतिम फेरीत सादर झालेल्या एकूण सहा एकांकिकांतून शाळेला रु.२१०००/–, प्रशस्तिपत्रक व चषक असे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच उत्तम दिग्दर्शक व उत्तम अभिनेता असेही पारितोषिक प्राप्त झाले.

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०१८ अंतर्गत शाळेतील विद्यार्थी नावीन्य मेटकरी – ९ अ व प्रज्ञा मोरे – १० अ यांनी सादर केलेल्या या प्रकल्पाची निवड राष्ट्रीय पातळीवरील परिषदेसाठी झाली. सदर परिषद २७ ते ३१ डिसेंबर २०१८ या काळात भुवनेश्वर, ओडिसा येथे होणार आहे.

इ.८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी खर्डीकर क्लासेस, डोंबिवली यांचेतर्फे 'करिअर गाइडन्स' विषयावर व्याख्यान आयोजित केले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**मटा कार्निव्हल स्टार्टअप**

आज मटा कार्निव्हल स्टार्टअप या कार्यक्रमासाठी झी मराठी वरील गाजलेल्या 'छत्रपती संभाजी महाराज व तुला पाहते रे' या दोन मालिकांमधील कलाकार अभिज्ञा भावे, तेजस्विनी पंडित, शशांक केतकर, शंतनू मोघे, प्रिया मराठे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थ्यांना नवउद्योजक बनण्याचे आवाहन केले. उपस्थित सर्व कलाकार हे केवळ छोट्या पडद्यावर वा चित्रपटात काम न करता आपापला व्यवसाय सांभाळतात. तेजस्विनी पंडित व अभिज्ञा भावे ह्या तेजाज्ञा गारमेंट्स हा कपड्याचा व्यवसाय करतात. शशांक केतकर हा एक हॉटेल यशस्वीपणे चालवतो. शंतनू व प्रिया मोघे बाँबे फ्राईज हे फास्ट फूड आउटलेट चालवतात. या कार्यक्रमात आलेल्या कलाकारांकडून आपापला उद्योग सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमास डॉ. महेश पाटील, डॉ. विमुक्ता राजे, प्रा. प्रशांत धर्माधिकारी, प्रा. मोहिनी कुलकर्णी, प्रा. डोईफोडे, प्रा. रुचिता गव्हाले, प्रा. मानसी जंगम उपस्थित होते.



कार्यक्रमात विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**

**०२२–२५४२ ६२७०**

किरकोळ दुःखामुळे अंतःकरण हळवे होते; दारूण दुःखे कोसळली की ते कठोर होते. – इमरसन

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

यामध्ये पेशिकेंद्रामध्ये अदलाबदल करण्यात येते. याचेही प्रयोग प्राण्यावरती यशस्वी होऊन नवीन प्राण्यांची निर्मिती करण्यात आली आहे. मानवी गर्भावरती मात्र असे प्रयोग करायला बंदी आहे. मार्च १९९७ 'दिशा'चे संपादकीय 'कथा आणि व्यथा डॉलीच्या जन्माची' यामध्ये याचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

वैज्ञानिक जिज्ञासा हीच विज्ञान-प्रक्रियेला जीवंत ठेवत असते.

वर उल्लेख केलेल्या सगळ्या प्रयत्नांनंतरही वैज्ञानिकांचे जनुकशास्त्रामधील हस्तक्षेपाचे तंत्र चालूच होते. अवघ्या ५ महिन्यात, शास्त्रज्ञांनी 'पॉली' नावाची आणखीन एक मेंढी, की जिच्या दुधामध्ये अशाप्रकारचे घटक निर्माण करण्याची क्षमता आणली, की ते दूध प्यायल्यावर 'क्रिसमस' रोग या एका रक्ताच्या असाध्य रोगावर नियंत्रण मिळवणे शक्य झाले. या रोग्यांना वारंवार नवीन रक्त द्यावे लागते. हा हस्तक्षेप या रोग्यांकरता मोठं वरदान ठरलं. 'दिशा'च्या जानेवारी १९९८ च्या 'डॉलीनंतर पॉली, पॉलीनंतर...?' या संपादकीयामध्ये याची विस्तृत चर्चा केली आहे.

या सर्व तंत्रज्ञानावरती कडी करणारे आणखीन एक पाऊल, वैज्ञानिकांनी CRISPR, म्हणजे जनुकांमधील हस्तक्षेपाचे एक 'साधन' (Gene Editing) विकसित केले. खऱ्या अर्थांनी ही जैवयांत्रिकी आहे. बिघडलेल्या यंत्रामधील भाग जसा बदलता येतो, तसा रोगाला कारणीभूत असलेल्या जनुकशृंखलेत हस्तक्षेप करून ती जनुकं व्यवस्थित करून निरोगी गर्भाची निर्मिती करता येऊ लागली. अर्थातच या आधी अनेक वर्षांच्या प्रयोगांचे संचित या यशामागे होतेच.

यातील सर्वात महत्त्वाचे पाऊल म्हणजे मानवी जनुकांचा नकाशा २००१ मध्ये प्रकाशित करण्यात आला. गेल्या १५ वर्षांमध्ये अनेक वनस्पती, ते उंदरांपासून, ते चिंपाझीच्या जनुकाचे नकाशे वैज्ञानिकांनी तयार केले आहेत.

'CRISPR', म्हणजे जनुकांच्या शृंखलेत हस्तक्षेप करण्याचे साधन या वैज्ञानिक प्रक्रियेला २०१५ मध्ये 'विस्मयकारक वैज्ञानिक क्रांतीचा' दर्जा देण्यात आला. १९५२ साली वॅटसन आणि क्रीक या संशोधकांनी DNA च्या रचनेची उकल केली. गेल्या ६५ वर्षांत विज्ञानाने या क्षेत्रात केलेली क्रांती थक्क करणारी आहे. सप्टेंबर २०१६ ला CRISPR वरती 'दिशा' च्या संपादकीयामध्ये या सगळ्या प्रवासाची दखल घेतली आहे.

सर्वसाधारणपणे प्रजननाकरता 'स्त्री' आणि 'पुरुष' बीजांची गरज असते. त्यांच्या संयोगातून गर्भ तयार होतो, आणि यामुळेच प्रत्येक व्यक्तीमध्ये 'आई' आणि 'वडिलां'कडून आलेले गुणधर्म असतात. अर्थातच ही प्रक्रिया वाटते तेवढी साधी नसते. पुरुष व स्त्रीबीजाच्या मिलनाच्या वेळी किंवा नंतर Mutation म्हणजे 'जनुकोत्परिवर्तन' होऊ शकते. यामुळे प्रत्येक व्यक्तीचे जसे स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्त्व तयार होते, तसेच काही नवीन रोगही यामुळे उद्‌भवू शकतात. शिवाय अनुवंशिकतेमुळेही एका पिढीपासून दुसऱ्या पिढीत रोग पुढे सरकत असतात.

जनुकाच्या नकाशामधील अशा रोगांना कारणीभूत जनुकांचा शोध वैज्ञानिक घेऊ लागले, आणि संपूर्ण 'निरोगी' गर्भ तयार करता येईल का? या प्रयत्नाला ते लागले. पेशींमध्ये जसे पेशीकेंद्र असते तसे इतरही घटक असतात की ज्यामुळे काही रोग आईकडून मुलाकडे संक्रमित होतात. वैज्ञानिकांनी पेशीकेंद्र बदलाची प्रक्रिया Clonning करता साध्य केली होती. त्याचेच पुढचे

छोटी दुःखे बोलकी असतात, पण मोठी दुःखे मात्र मुकीच राहतात! - लिव्ही

पाऊल म्हणून आईच्या पेशीकेंद्रामधील बाधीत घटकाला काढायचे, व दुसऱ्या स्त्रीबीजामधील निरोगी घटकाचे तिथे रोपण करायचे. म्हणजे जेव्हा स्त्री व पुरुष बीजाचे मिलन होऊन गर्भ तयार होतो तो मूळ आईच्या रोगापासून मुक्त होऊन निरोगी होतो. म्हणजे तत्त्वतः येथे दोन आया व एक वडील अशा माध्यमातून नवीन गर्भ तयार होतो. हेही असेच एक क्रांतीकारक पाऊल आहे. दिशाचे संपादकीय 'सर्जनाचे एक पाऊल पुढे' या फेब्रुवारी २०१५ च्या अंकात याचा विस्तृत ऊहापोह केला आहे.

वैज्ञानिकांच्या कल्पनांचा हा प्रवास कधीच थांबणार नाही. वर आपण बघितलेच आहे की, अशा प्रत्येक क्रांतीकारक पाऊलाच्या वेळी धार्मिकच नाही तर वैज्ञानिकांकडूनही त्याला प्रतिकार किंवा सावधतेचा इशारा मिळाला आहे. यातूनच अशा सगळ्या प्रयोगाकरता 'विज्ञान–नैतिकते'ची (medical ethics) चौकट घालून दिली जाते व असे नवे सर्व प्रयोग या चौकटीतच करावे लागतात.

हे सगळे प्रयोग हे शेवटी माणसाला जास्तीत जास्त निरोगी करण्याचा प्रयत्न आहेत.

तरीही त्याला होणारा विरोध ही माणसामध्ये असलेली लालसा आणि दुरुपयोग करायची त्याची क्षमता यामुळेच होत असतो. He Jiankui यांनीसुद्धा जो प्रयोग केला आहे तो सर्वसाधारण 'विज्ञान नीतीचे' उल्लंघन करून केला आहे. आज गर्भावरील अशा प्रयोगाला परवानगी नसली तरी आनुवांशिक रोगावरती मिळू शकणाऱ्या नियंत्रणामुळे कदाचित काही अटींवरती अशा प्रयोगांना परवानगी द्यावी असे अनेक शास्त्रज्ञांचे मत आहे.

येथे प्रश्न आहे तो माणसातील विवेक व संतुलन बुद्धीचा. नाझी विज्ञान काय, किंवा अणुचा विध्वंसक वापर काय; आपणच विज्ञानाच्या केलेल्या दुरुपयोगाची ती उदाहरणे आहेत. आज माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ही प्रचंड क्रांती होत आहे. फेसबुक, व्हाट्सअप, इंटरनेट ही वास्तविक माणसाला विज्ञानाने मिळालेली वरदाने आहेत. पण यांचाच मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग होताना दिसतोय.

He Jiankui यांच्या प्रयोगांनी या क्षेत्रातील वैज्ञानिक जग हादरून गेले आहे. बहुतेक सर्वांनी त्यांचा धिक्कार केला आहे. नव गर्भावरील अशा प्रयोगांना आजही मान्यता नाही. नव अण्वस्त्र निर्मितीला जगात परवानगी नसली, तरी प्रगत आणि अप्रगत देशात उघडपणे किंवा छुपेपणे त्यांची निर्मिती चालूच आहे. जैवयांत्रिकी, आणि जनुकांच्या नकाशातील हस्तक्षेप यांच्या बाबतीतही हेच चालू आहे. हा सगळ्या प्रयोगांमुळे अनेक असाध्य रोगांवर नियंत्रण मिळवणे शक्य असले तरी अशा प्रयोगांची पुरेशी वैज्ञानिक पडताळणी अजून झाली नसल्यामुळे वैज्ञानिकांचाही अशा 'अनियंत्रित' प्रयोगांना विरोध आहे.

केशवसुतांची 'तुतारी', भा. रा. तांब्यांची 'जन पळभर म्हणतील हाय हाय', किंवा माधव ज्युलियनांची 'प्रेम स्वरूप आई' या नुसत्या कविता नाहीत, तर जीवनातील वास्तवाच्या त्या संहिता आहेत.

कवीची कल्पना काय किंवा वैज्ञानिकांची नवीन जाणून घेण्याची जिज्ञासा काय, या मानवी सृजनाचाच भाग आहेत. म्हणूनच त्या नवनिर्मितीच्या स्रोत आहेत. त्याचे नेहमीच कौतुक आणि नियंत्रित वैज्ञानिक प्रयोगांचे समर्थनच करायला हवे.

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.